According to 16% respondents third important reason for enrollment and drop-out is children are employed for cattle grazing while 11% parents show the reason that school is far away from their houses and 10% find education useless.

According to steps taken for improving enrollment and decreasing drop-out, the respondents were asked about teacher and their appointment. They were asked that should the teacher from Gond community be appointed in the schools.

The response is positive, because most of the respondents i.e. 99% said that teacher from their own community is always better. Due to such teachers, the children may feel interesting in going to school. The demand has been supported by almost all the people.

**School preference and reasons**

Govt. has provided schools in Nanded district. Almost all the villages inhabited by Gonds have schools run by local. Self Govt. bodies (Z.P. co-operation etc). The Govt. has also started setting up Aashram Schools in tribal areas. Aashram schools are purposefully created for catering education to all the tribal children.

The respondents were asked about the preference for schools. 75% of the respondents favored 'Aashram Schools'. They said that Z.P. schools are not in well condition. They lack teachers but 25% respondents still prefer Z.P. schools to Aashram Schools. 58% respondents opined that Aashram schools provide quality education to children. Most of the respondents i.e. 77% find 'Aashram Schools' as a right centre for learning. They said that these schools provide meals, books, uniforms as well as discipline, manners to children and everything is provided free for the cost, thus they send their children to 'Aashram School'.

On the other hand it is seen that those who like local .schools have several reasons behind their liking. According to 30% respondents, when they admit their children in local schools, then home-schooling is possible and 31% respondents say that due to the local schools, children do not go astray (don't divert from education). But majority of the respondents who prefer local schools i.e. 46% find that when children study in local schools, they can use children in doing farming activities as local schools are not

strict in terms of attendance. There are 43% respondents who also think that to local schools, children can be employed in domestic works.

Thus it can be said that due to domestic, farming activities, Gonds from Nanded send their children to local schools.

**Functioning of School**

Administration or functioning of schools plays vital role in the enrollment success of school. All the respondents had given their opinions on this issue. 72% of them said that the teachers from the school attend school regularly. They are very punctual. They are satisfied with the regularity of teachers. But they also say that there are also some malpractices in examination as well as administration.

According to 71% respondents, children never find schools not like their homes. It means teachers from the schools take care of them like their parents. They find that going to the schools as an interesting thing but according to 29% respondents, schools punish children in harsh manner. Some teachers practice discrimination in classroom.

Yet majority of the respondents opine that the school teachers take care of their children. But as the school curriculum is quite burdensome thus students don't find it interesting.

**Findings and Conclusions**

The findings have been focused on the three aspects of education i.e. Access, Equality and Quality.

1. The efforts from both central and state govt. as well as NGOs have found to be fruitful. The manifold efforts have increased the literacy rate of Gonds has been increased during one decade 1991-2001. Though the literacy rate has improved sustainable among ST population it is still much below the literacy rate of the state population of Maharashtra. The female literacy rate of Gonds is also less as compared to female literacy rate of state.

2. Though the literacy rate of Gonds has been increasing but it is not increased satisfactorily at higher level of education. Regarding access it is found that the standard infrastructure facilities are still far away from Gonds.

3. A large proportion of Gonds do not send their children to school and utilize the free educational opportunities offered to them.

4. The reasons that several but the key reason is the disinterest of Gonds in education, due to their economic condition.

5. The practical and utilitarian aspects of education appeal to them more. The idea of taking education for its own sake does not interest them. It may be because the difference between sources of livelihood and education is huge. Therefore we should provide short term applied courses community based resources, like honey bee keeping dairies etc.

6. The large proportion of tribal students drop-out at the middle school as well as high school stage, the key reason is dire poverty.

7. Most of the teachers from tribal schools are not from tribal communities. Thus, it creates the problems of language barriers, discrimination etc.

8. Underling the importance of instruction through the mother tongue and the need for preparing teaching / learning in tribal languages.

9. Lastly tribal education can be categorized as external, internal socio-economic and psychological.

**Reference**

1) Bailey F.G. (1958): Caste and Economic Frontiers, A village in highland Orissa, oxford university press, Bombay.

2) Bose N.K. (1971) Tribal in India, Govt. publication Delhi.

3) Haimerdorf C.V.F. (1948) Macmillan London.

4) Singh K.H.(1985) Tribal society in India, An anthrop-historical perspective, Manohar book serrice, New Delhi.

5) Gare Govind (1997) Advashiche shikashan,saket prakashan, Aurangabad

* * *

# आदिवासी मातांचे त्यांच्या बालकांच्या स्वास्थ व पोषणाविषयी ज्ञान, मतप्रणाली व अवलंबन मानसिकता मूल्याकनात्मक दृष्टीक्षेप

कु.वैशाली सु.देशमुख
डॉ.शरद या.कुलकर्णी

अनेक वांशिक प्रजातीपासून उदयाला आलेली, बोलीभाषा, चालीरिती, सामाजिक मूल्ये, आर्थिक विकास इत्यादी बाबतीत विविधतेने परिचित असलेली आदिवासी जमात ही भारतीय संस्कृतीचा सांस्कृतिक जीवन शैलीमुळे आदिवासी साहित्यिक, संशोधन तथा राजकीय क्षेत्रातील व्यक्तींच्या साहित्य निर्मिती तथा विकासासाठी केंद्रबिंदू ठरले आहेत. प्रामुख्याने आदिवासी मातांचे त्यांच्या बालकांच्या योग्य पालन-पोषण करण्यासाठी बालकांच्या आहार व पोषण दर्जाविषयी ज्ञान विकास व अनुकूल मतप्रणाली प्रस्थापित करण्यासाठी सक्षमीकरण करुन सुदृढ बालकांची निर्मिती करुन आदिवासी संस्कृती टिकविणे ही काळाची गरज ठरली आहे. अज्ञान महिलांना बालसंगोपनाविषयी असलेली अनभिज्ञता यामुळे बालकांचे आरोग्य हा एक चिंतेचा विषय झाला असून कुपोषणाच्या ज्ञाना अभावी बालमृत्युचे प्रमाण उल्लेखीनय झाले असे म्हणावे लागेल.

बालके ही राष्ट्राची मानवी साधनसंपत्ती असून राष्ट्राचा विकास व पर्यायाने भवितव्य बऱ्याचशा प्रमाणात बालकांच्या सर्वकष विकासावर अवलंबून आहे. त्यामुळे त्यांच्या पालनपोषणाकडे लक्ष केंद्रीत करणे निकडीचे ठरते. बालकांच्या विकासाची जबाबदारी ही सर्वार्थाने

* द्वारा-एस.ए.देशमुख, मनकर्णानगर, अमर कॉलनी मागे, बायपास, अमरावती- ४४४६०६

मातेवर असते. शासनाच्या वतीने बालकांच्या व मातेच्या स्वास्थ्यासाठी आदिवासी क्षेत्रात अंगणवडी, प्राथमिक आरोग्य केंद्र तथा अशासकीय संस्थाद्वारे अनेक योजना कार्यान्वित केल्या आहेत. या योजनांतर्गत स्वास्थ व पोषण दर्जाविषयीची माहिती आदिवासी मातांना निरनिराळया माध्यमांद्वारे दिली जाते. ज्यायोगे आदिवासी मातांचे त्यांच्या बालकांच्या स्वास्थ व पोषण दर्जाविषयी ज्ञानात भर पडून त्यांच्या प्रतिकूल मतप्रणाली व अवलंबन मानसिकतेत अपेक्षित बदल घडवून आणणे आवश्यक ठरते.

उपरोक्त पार्श्वभूमीवर संशोधन क्षेत्रातील आदिवासी मातांचे त्यांच्या बालकांच्या स्वास्थ व पोषण दर्जाविषयी असलेले ज्ञान, त्याविषयी त्यांची असलेली मतप्रणाली व अवलंबन मानसिकेतेचे मूल्यमापन करुन त्यात त्यांना अनुभवास येणाऱ्या अडचणी जाणून घेऊन त्यांच्याकडून अडचणींच्या निरसणार्थ उपाय जाणून घेणे अत्यावश्यक ठरते.

आदिवासी संस्कृतीच्या विकासाचा पाया आदिवासी मातांचे ज्ञानवर्धित सक्षमीकरण व त्यातला त्यात बालकांचे स्वास्थ व पोषण याविषयी त्यांचे असलेले ज्ञान, प्रचलित मतप्रणाली व पुरस्कृत पध्दतीसाठी त्यांचे असलेले अवलंबन मानसिकता तपासून पाहणे हे उदिष्टय डोळयासमोर ठेवून प्रस्तुत संशोधन हाती घेण्यात आले. आदिवासी बालकांच्या स्वास्थ व पोषणाच्या अनुषंगाने त्यांना ज्ञानाच्या स्वरुपात असलेल्या माहितीची पडताळणी, त्याबद्दल त्यांचे असलेले मत व स्वास्थ व पोषणाविषयी शिफारस केलेल्या पध्दतीचे अवलंबन करण्यासाठी त्यांच्या मानसिकता गुणात्मक (Quantitative) पध्दतीने पडताळून पाहण्यासाठी मोजमापकाचे विकसीकरण करणे अर्थातच संशोधनाच्या कक्षेत आलेच. यावर संशोधनाची व्याप्ती अर्थातच सिमित ठेवणे योग्य न वाटण्यावरुन संशोधनकांनी संशोधनात आदिवासी मातांना त्यांच्या बालकांच्या स्वास्थ व पोषणाचे संगोपन प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी व त्यावर

मात करण्यासाठी आदिवासी मातांकडूनच सूचनांचा स्वीकार याचांही संशोधनाच्या व्याप्तीत (Scope) समावेश केला.

प्रस्तुत संशोधनासाठी महाराष्ट्रातील पूर्व-विदर्भांतर्गत अमरावती जिल्हयातील मेळघाट भागातील चिखलदरा तालुका व त्यात समाविष्ट असलेली दहा खेडी निवडण्यात आली. संशोधनासाठी हे कार्यक्षेत्र निवडण्याचे प्रमुख कारण म्हणजे अमरावती जिल्हयातील मेळघाट विभाग आणि प्रामुख्याने चिखलदरा तालुका हा आदिवासी जमातीच्या दाट लोकसंख्या व वास्तव्यासाठी महाराष्ट्रात परिचित आहे. या संशोधनपर लेखाची प्रमुख लेखिका महिला असल्यामुळे अर्थातच खेडयाची निवड करताना दळणवळणाच्या मार्गाची सुविधा, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्र व त्यातील कर्मचाऱ्यांच्या सहकार्याची खात्री व त्याचबरोबर आदिवासी मातांची संख्या व उपलब्धता लक्षात घेण्यात आली.

निवडलेल्या दहा खेडयातील आदिवासी मातांच्या याद्या अंगणवाडी व प्राथमिक आरोग्य केंद्र कर्मचाऱ्यांकडून प्राप्त करुन प्रत्येक खेडयामधून २० आदिवासी माता याप्रमाणे '$N^{th}$' निवड पध्दतीने एकूण (२००) आदिवासी मातांची निवड करण्यात आली.

संशोधनासाठी निश्चित केलेल्या उदिष्टांना आवश्यक असलेल्या माहितीचे संकलन करण्यासाठी योग्य अशी प्रश्नावली / अनुसूचि विकसित करण्यात आली. आदिवासी मातांचे त्यांच्या बालकांच्या स्वास्थ्य व पोषण दर्जाविषयक त्यांचे ज्ञान, मतप्रणाली व अवलंबन मानसिकता जाणून घेण्यासाठी शास्त्रीयदृष्टया परिपूर्ण असे मोजमापक विकसित करण्यात आले व ते अर्थात प्रश्नावली / अनुसूचिचे अभिवाज्य घटक समजण्यात आले.

प्रश्नावली /अनुसूचि व मोजमापकाच्या सहाय्याने प्रतिवेदक आदिवासी मातांकडून मुलाखतीद्वारे तथ्य संकलन करण्यात आले. संकलित केलेल्या तथ्याचे (Data) सांख्यिकी विश्लेषण करुन प्राप्त परिणाम खालील तक्त्यात प्रस्तुत

करण्यात आलेले आहे. मोजमापकात समावेश केलेल्या प्रश्नांना दिलेल्या उत्तराच्या अचूकतेच्या आधारावर निर्धारित प्रणालीनुसार गुणप्रधान करण्यात आले. प्राप्त गुणांच्या आधारावर त्यांना वर्गीकरण विभागात ठेवण्यात आले. विभागणीसाठी Quartial Method वापर करण्यात आला.

**तक्ता**

**प्रतिवेदक आदिवासी मातांचे त्यांच्या बालकांच्या स्वास्थ व पोषणाविषयी त्यांची ज्ञान पातळी, मतप्रणाली व अवलंब मानसिकता गुणांकानुसार (Score) वर्गीकरण.**

| अ.क्र. | स्वास्थ व पोषणाविषयी व मोजमापकावरील गुणांत तफावत | | प्रतिवेदक मातांचा प्रतिसाद | |
|---|---|---|---|---|
| | | | संख्या (एकूण संख्या) | प्रतिशत |
| (अ) | ज्ञानपातळी | | | |
| | १. | समाधानकारक (६० पेक्षा जास्त) | ३० | १५.०० |
| | २. | सर्वसाधारण (३१ ते ६०) | ८० | ४०.०० |
| | ३. | असमाधानकारक (३० पेक्षा कमी) | ९० | ४५.०० |
| (ब) | मतप्रणाली (मनाचा कल) | | | |
| | १. | अनुकूल (६० पेक्षा जास्त) | ९० | ४५.०० |
| | २. | सर्वसाधारण (३१ ते ६०) | ७५ | ३७.५० |
| | ३. | प्रतिकूल (३० पेक्षा कमी) | ३५ | १७.५० |
| (क) | अवलंबन मानसिकता | | | |
| | १. | अनुकूल (६० पेक्षा जास्त) | १३५ | ६७.५० |
| | २. | सर्वसाधारण (३१ ते ६०) | ३५ | १७.५० |
| | ३. | प्रतिकूल (३० पेक्षा कमी) | ३० | १५.०० |

वरील तक्त्यावरुन आदिवासी प्रतिवेदकमातांचे त्यांच्या बालकांच्या स्वास्थ्य व पोषणाविषयी असलेले ज्ञान, त्याविषयी त्यांच्या मनाचा कल दर्शविणारी मतप्रणाली व अवलंबन मानसिकतेच्या प्रतिसादाचे संस्थात्मक स्वरुप लक्षात येते.

वरील तक्त्यात समाविष्ट केलेल्या माहितीवर दृष्टी टाकल्यास असे निदर्शनास येते की, जास्तीत जास्त (४५.०० टक्के) प्रतिवेदक आदिवासी माता या त्यांच्या बालकांच्या स्वास्थ व पोषणाविषयी प्रचलित माहितीबाबत अनभिज्ञ असून असमाधानकाक ज्ञान पातळी वर्गीकरण विभागात आहे. त्याखालोखाल म्हणजे ४० टक्के प्रतिवेदक आदिवासी मातांचे त्यांच्या बालकांच्या स्वास्थ व पोषणविषयी सर्वसाधारण म्हणजे गरजेपुरते ज्ञान/माहिती बाळगून आहे असे दिसते. मात्र १५.०० टक्के आदिवास प्रतिवेदक माता त्यांच्या बालकांच्या स्वास्थ व पोषण दर्जाविषयी अपेक्षित माहितीच्या स्वरुपात ज्ञानी आहेत.

अलिकडच्या काळात आदिवासी विभागात शासनाच्या वतीने आदिवासी माता व मुख्यत्वे बालकांच्या स्वास्थ व रक्षणासाठी अनेक योजना कार्यान्वित केल्या असून अंगणवाडी व प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कर्मचाऱ्यांच्या वतीने राबविल्या जात आहेत. या योजना राबविताना शासनाच्या सूचनेनुसार हे कर्मचारी जागरुक असून आदिवासी मातांना त्यांच्या बालकांच्या स्वास्थ व पोषणाविषयी निरनिराळया मार्गाने माहिती पुरविली जाते. मुख्य म्हणजे माता सुध्दा आपल्या बालकांच्या स्वास्थ्याविषयी जागरुक असल्यामुळे संबंधित माहिती प्राप्त करुन घेतात. त्यामुळे सर्वसाधारण व समाधानकारक ज्ञान असणाऱ्या आदिवासी मातांची संख्या वरीलप्रमाणे असावी. मात्र जास्तीत जास्त मातांची संख्या त्यांचे याविषयीचे ज्ञान असमाधानकारक असल्याचे दर्शविते. याचे कारण कदाचित त्यांची चिंताजनक आर्थिक स्थिती, दारिद्रय, निरक्षरता दुर्गम भागातील त्यांचे वास्तव्य, अंगणवाडी व प्राथमिक आरोग्य केंद्राचा

अभाव व असलेल्या केंद्राना भेटीचा अभाव ही कारणे असल्याचे नाकारता येणार नाही.

आदिवासी मातांकडून त्यांच्या बालकांच्या स्वास्थ व पोषणाविषयी त्यांच्या मनाचा कल किंवा मत प्रणाली जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता असे निष्पन्न झाले की जास्तीत जास्त आदिवासी ४५.०० टक्के प्रतिवेदक माता आपले त्याविषयी अनुकूल मत दर्शवितात. व्यक्त करतात आणि हे स्वाभाविक आहे. कारण त्यांच्या बालकांचे उज्वल भवितव्य, व्यक्तीमत्व विकास, शैक्षणिक प्रगती, शारीरिक व बौध्दीकविकास हा त्यांना लाभणारे त्या काळातील स्वास्थ व मिळणाऱ्या पोषणावर अवलंबून असते. हे त्यांना योग्य प्रकारे पटलेले असते. मात्र काही अपरिहार्य कारणामुळे ज्यात अंधश्रध्दा, दारिद्रय याचा समावेश होतो, अशा मातांना त्यांचे महत्व पटलेले नसावे. त्यामुळे कमी का होईना अशा मातांची संख्या ३५ असल्याचे संशोधकांना आढळून आले.

अवलंबन मानसिकता म्हणजे त्यांच्या बालकांच्या स्वास्थ व पोषण दर्जाविषयक शिफारशींचे अवलंबन करण्याची तयारी पडताळून पाहताना जास्तीत जास्त प्रतिवेदक आदिवासी माता (६७.५० टक्के) आपली संपूर्ण तयारी दर्शवितात. याची कारणेही स्पष्ट आहे. अनुकूल परिस्थिती प्राप्त झाल्यास ते त्यांना शक्य न होण्यास कारण नसावे. सर्वसाधारण तत्परता व प्रतिकूल अवलंबन मानसिकता प्रगट करणाऱ्या प्रतिवेदक आदिवासी मातांची संख्या अनुक्रमे ३५ ते ३० असल्याचे वरील तक्त्यातील माहितीवरुन दिसून येते. याचे कदाचित त्यांच्या त्या आड येणाऱ्या चालीरिती परंपरा व मूल्यांचे प्रबळ प्रभाव असावा, म्हणून त्यांनी तसा प्रतिसाद दिला असावा.

वरील विवरणावरुन संशोधन क्षेत्रातील प्रतिवेदक आदिवासी मातांचे त्यांच्या बालकांच्या स्वास्थ व पोषण दर्जाविषयी सध्या स्थितीतील असलेले माहितीच्या स्वरुपातील ज्ञान, त्यांच्या त्याविषयी असलेल्या मनाचा कल व त्यांची

मतप्रणाली तथा शिफारस किंवा पुरस्कृत पध्दतीचे त्यांच्या बालकांच्या स्वास्थ रक्षणार्थ अवलंबन मानसिकतेचे चित्र स्पष्ट होते.

**बालकांचा स्वास्थ व पोषण दर्जा टिकविताना प्रतिवेदक मातांना येणाऱ्या अडचणी-**

प्रतिवेदक आदिवासी मातांना त्यांच्या बालकांचा स्वास्थ व पोषण दर्जा टिकविताना निरनिराळया अडचणी येणे अगदी स्वाभाविक आहे. मुलाखती दरम्यान त्यांना अडचणी सांगण्याबद्दल विचारले असता त्यांनी खालील निरनिराळया अडचणींचा उल्लेख केला.

१. स्वास्थ व पोषण दर्जा म्हणजे काय ? हे मूळातच माहिती नाही (९२.५० टक्के) प्रतिवेदक माता

२. अंगणवाडी व प्राथमिक आरोग्य केंद्र कर्मचारी याविषयी माहिती समजावून सांगत नाही. (९२.५० टक्के)

३. प्रतिकूल आर्थिक परिस्थितीमुळे बालकांचा स्वास्थ व पोषण दर्जा टिकविण्यास असमर्थ ठरतात. (९०.०० टक्के)

४. बालकांचा स्वास्थ व पोषण दर्जा जपण्यासाठी कुटुंबांतील सदस्यांच्या सहकार्याचा अभाव (९५.०० टक्के)

५. बालकांचा स्वास्थ व पोषण दर्जा टिकविण्यासाठी शिफारस केलले अन्न घटकांच्या सेवनासाठी बालकांकडून होणारा विरोध (७५.०० टक्के)

६. स्वास्थ व पोषण दर्जा टिकविण्यासाठी आवश्यक असलेले अन्नघटक (अन्नसत्वे, जीवनसत्वे, खनिजद्रव्ये इत्यादी) सहज उपलब्ध होत नाही. (८७.०० टक्के)

**बालकांच्या स्वास्थ व पोषण दर्जा टिकविण्यासाठी प्रतिवेदक मातांनी केलेल्या सूचना :-**

१) अंगणवाडी व प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचाऱ्यांनी सरळ, सोप्या व मातांना सहज समजेल अशा भाषेत बालकांचा स्वास्थ

पोषण दर्जा याविषयी सविस्तर माहिती सांगावी.

२) बालकांचा आहार व पोषणदर्जा टिकविण्यासाठी कुटुंबांतील सदस्य व मुख्यत्वे बालकांनी सहकार्य पुरवावे.

३) प्राथमिक आरोग्य केंद्रात बालकांची नियमित शारिरीक तपासणी करुन स्वास्थासाठी योग्य त्या सूचना द्याव्यात.

४) अंगणवाडी व प्राथमिक केंद्राद्वारे पोषक खाद्य व औषधी पुरविण्यात यावी.

५) बालकांच्या उज्वल भवितव्यासाठी स्वास्थ व पोषणाचे महत्व शिबिरे प्रशिक्षण प्रत्यक्ष गृहभेटी देऊन सांगावे.

६) आदिवासी मातांच्या त्यांच्या बालकांच्या स्वास्थ व पोषणाविषयी रुढी, चालीरिती, मूल्ये यावर आधारीत मनाचा कल बदलविण्यासाठी प्रयत्न व्हावे.

वर नमूद केलेल्या अडचणी या आदिवासी मातांच्या प्रत्यक्ष अनुभवावर आधारीत असून वस्तुनिष्ठ वाटतात. त्यांचा शासकीय स्तरावर किंवा अंगणवाडी प्राथमिक आरोग्य केंद्र तथा अशासकीय संबंधित यंत्रणा यांच्या स्तरावर काळजीपूर्वक विचार करणे गरजेचे आहे.

आदिवासी मातांचे त्यांच्या बालकांच्या स्वास्थ व पोषण दर्जाविषयक असलेल्या तोकडया ज्ञानामध्ये भर पडते. त्यांचे त्याविषयी असलेली प्रतिकूल मतप्रणालीत फरक घडवून आणणे व त्यांचे असलेली अवलंबन मानसिकतेत बदल घडविणे हे आदिवासी बालकांच्या उज्वल भवितव्यासाठी म्हणजेच पर्यायाने आदिवासी सांस्कृतिक वारसा टिकविण्यासाठी ही काळाची गरज आहे. त्यासाठी संबंधितांनी आपआपले कर्तव्ये योग्यरितीने पार पाडल्यास हे अशक्य नाही.

आदिवासी बिगर आदिवासी मातांचे त्यांच्या बालकांच्या स्वास्थ व पोषणाविषयी ज्ञानाचे, मतप्रणालीचे व अवलंबन मानसिकतेचे मोजमापन करण्यासाठी मोजमापक

| अ.क्र. | स्वास्थ व पोषणांतर्गत दर्शक १ बाब आणि निर्धारित गुण | प्रतिवेदक मातांचा प्रतिसाद व त्यासाठी प्रस्तावित गुण<br>माहिती आहे/अल्प प्रमाणात/<br>मूळीच माहिती नाही. | | |
|---|---|---|---|---|
| | | सहमत/ मानसिकता | माहिती आहे/ प्रतिसाद नाही | नाही/ असहमत मानसिकेतेचा |
| अ. | स्वास्थ/आरोग्य | | | |
| १) | स्वास्थाचा अर्थ रागापासून मुक्तता, सुदृढ शरीर, आनंदी/उत्साही मन व सर्वांशी सलोख्याचे संबंध म्हणजे स्वास्थ/आरोग्य (१०) | | | |
| २) | विशिष्ट वयानुसार शरीराची झालेली प्रमाणबध्द वाढ व विकास<br>❖ उंची<br>❖ वजन (१०) | | | |
| ३) | उत्तम स्वास्थाची लक्षणे<br>❖ सशक्ती शरीर<br>❖ उत्साह<br>❖ कार्यशक्ती<br>❖ सतेज क्रांती<br>❖ समाधानी वृत्ती<br>❖ आनंदी मन | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ❖ समाजशील प्रवृत्ती (१०) | | | |
| ४) | निकृष्ट स्वास्थ्याची लक्षण<br>❖ निस्तेज चेहरा<br>❖ तेलकट/शुष्क ओठ<br>❖ पिवळे डोळे<br>❖ चिडचिडेपणा<br>❖ उदासिनता<br>❖ रोग/व्याधीग्रस्त (१०) | | | |
| ५) | बालकांच्या उज्जवल भवितव्याच्या दृष्टीने स्वास्थ्याचे महत्व (१०) | | | |
| ६) | स्वास्थ्याचा अर्थ<br>❖ स्वास्थ म्हणजे रोगापासून मुक्तता होय<br>❖ स्वास्थ म्हणजे सुदृढ सशक्त शरीर<br>❖ स्वास्थ म्हणजे आनंदी मन<br>❖ सर्वांशी मिळून-मिसळून सलोख्याचे संबंध हे स्वास्थ्याचे द्योतक आहे.<br>❖ स्वास्थ आणि आरोग्य एकच | | | |
| ७) | ❖ विशिष्ट वयानुसार शरीराची प्रमाणबध्द वाढ होते<br>❖ विशिष्ट वयानुसार विकास होतो. | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ❖ विशिष्ट वयानुसार उंची वाढते<br>❖ विशिष्ट वयानुसार वजन वाढते<br>❖ विशिष्ट वयानुसार कमरेचा/ छातीचा व डोक्याचा आकार वाढतो | | | |
| ८) | उत्तम आरोग्याच्या लक्षणात- सशक्त शरीराचा समावेश होतो.<br>❖ सशक्त शरीर असले तर उत्साह वाढतो.<br>❖ सशक्त शरीर असले तर कार्यशक्ती वाढते<br>❖ कांती सतेज असते.<br>❖ चिडचिडेपणा दिसत नाही. | | | |
| ९) | निकृष्ठ स्वास्थ्यामुळे<br>❖ चेहरा निस्तेज दिसतो..<br>❖ ओठ कोरडे दिसतात.<br>❖ डोळयाचा रंग पिवळा होतो.<br>❖ उदासिनता प्रत्ययाला येते.<br>❖ रोग व्याधी दिसून येतात. | | | |
| १०) | वैयक्तिक स्वच्छता /आरोग्यात-<br>❖ स्वच्छ दात<br>❖ स्वच्छ जीभ<br>❖ स्वच्छ तोंड<br>❖ स्वच्छ शरीर | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ❖ कापलेली नखे | | | |
| ११) | बालकांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी स्वास्थ चांगले असणे गरजे आहे. | | | |
| १२) | पोषणाचा अर्थ<br>❖ ज्या अन्नामुळे शरीराची योग्य प्रकारे वाढ होते. | | | |
| १३) | पोषक घटक | | | |
| | ❖ प्रथिने, कर्बोदके, जीवनसत्वे, खनिजद्रव्य<br>❖ भोज्य घटक | | | |
| १४) | प्रथिनामुळे शरीराला होणारा उपयोग होतो.<br>❖ शरीराची झीज भरुन निघते.<br>❖ शरीराची वाढ होते | | | |
| १५) | जी.अ.ची शरीराला असणारी गरज<br>❖ डोळयांच्या स्वास्थ्यासाठी<br>❖ रोगप्रतिकारक शक्तीसाठी | | | |
| १६) | लोहाचा शरीराला होणारा फायदा<br>❖ हिमोग्लोबीनचे प्रमाण वाढविण्यासाठी<br>❖ रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठी | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७) | कॅल्शीयमची शरीरासाठी असणारी गरज<br>❖ हाडांच्या दातांच्या मजबूतीसाठी<br>❖ शरीर बळकटीसाठी | | | |
| १८) | समतोल आहार म्हणजे<br>❖ ज्या आहारामध्ये संपूर्ण अन्नघटक योग्य त्या प्रमाणात असतात. | | | |
| १९) | बालकांच्या विकासात योग्य पोषणाचा होणारा फायदा<br>❖ शरीराची योग्यप्रकारे वाढ होते.<br>❖ मानसिक व शारिरीक विकास होतो. | | | |

संदर्भ :-


| | | |
|---|---|---|
| Anonymous | 2006-07 | Assessment of Nutritional Status of Under Five year Rural Children in selected district, Govt. of India, UNICEF Programme of Co-Operation (03-07) Annual Report pp to-12 Medak District Andhra Pradesh. |
| Barretti, H, and Browne, A | (1996) | Health Hygiene and Material Education Evidence form the Gambi Soc.Sci.Med.4343 (11) : 1579-99 |
| Devdas, R,P. and Easwarn P | (1967) | Influence of Socio Economics Factors of Food intake of Pre Community Jour of Dietetics 4 pp 156-161 |
| Emmons L and Hayes M | (1973) | Nutritional Knowledge of Mother and children. J. Nutritional and educaton 5 : 134 |
| Ghatoi and Kale | (1998) | Problems Associated with child Rearing Among Korku Mothers in Melghat.J. of Mah.Extn Edu$^{n}$. VolXp1197 |


* * *

# यवतमाळ जिल्हयातील आदिवासींच्या प्रमुख समस्या

* प्रा.डॉ.योगेश दा.उगले

महाराष्ट्र राज्याचे भौगोलिक क्षेत्र ३,०७,७९३ चौ.कि.मी.एवढे आहे. त्यापैकी ५०,७५७ चौ.कि.मी क्षेत्र आदिवासी उपयोजनेखाली येते. त्याचे प्रमाण १६.५% एवढे आहे. राज्यात एकूण ३५ जिल्हे असून आदिवासी ज्या भागात राहतात त्या भागाचे भौगोलिकदृष्टया सहयाद्री विभाग, सातपुडा विभाग, गोंडवाना विभाग असे तीन विभाग पडतात. महाराष्ट्राच्या पूर्वेस विदर्भ प्रांतात गोंडवाना विभागातील डोंगराळ व जलमय प्रदेश असणारा आदिवासीबहुल क्षेत्र असणारा यवतमाळ हा महत्वाचा जिल्हा आहे.

यवतमाळ जिल्हा १९° २६' व २०°४२' उत्तर अक्षांश आणि ७७°१८' व ७९°९' पूर्व रेखांशावर असून उत्तरेकडे अमरावती व वर्धा जिल्हा, पूर्वेस चंद्रपूर जिल्हा, दक्षिणेकडे आंध्रप्रदेश राज्य व नांदेड जिल्हयाचा भाग, पश्चिमेकडे परभणी, अकोला व वाशिम जिल्हयाचा भाग आहे. जिल्हयाचे क्षेत्रफळ १३५८२ चौ.कि.मी.असून क्षेत्रफळात राज्यात ६ वा क्रमांक आहे. राज्यातील ४.४१% परिक्षेत्र या जिल्हयाचे आहे. १९९१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्येची घनता दर किलोमीटर १५३ एवढी आहे. यवतमाळ जिल्हयात यवतमाळ, दारव्हा, राळेगांव, कळंब, बाभुळगांव, नेर, वणी, पुसद, महागांव, उमरखेड, दिग्रस, घाटंजी, केळापूर, मारेगांव आणि झरीझामणी असे एकूण १६ तालुके असून जिल्हयाचे मुख्यालय **यवतमाळ शहर** हे आहे.

यवतमाळ जिल्हयातील आदिवासींची लोकसंख्या १३,५८२ चौ.कि.मी.मध्ये पसरलेली आहे. त्यात गोंड जमात ही घाटंजी, केळापूर, मारेगांव, झरीझामणी, वणी व यवतमाळ तालुक्यात आहे. आंध ही जमात उमरखेड, पुसदमध्ये आहे. दिग्रस तालुक्यात कोलाम जमात, मारेगांव, झरीझामणी, वणी तालुक्यात हलबा, हलबी, बाभुळगांव, नेर, दारव्हा आर्णी तर पारधी ही जमात महागांव तालुक्यात

राज्यशास्त्र विभाग प्रमुख, शिवरामजी मोघे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पांढरकवडा, जि.यवतमाळ

मोठया प्रमाणात आहे. १९९१ च्या जनगणनेनुसार यवतमाळ जिल्हयातील आदिवासी एकूण लोकसंख्या ४४५८०४ असून २२६५०१ पुरुष तर २१९३३९ एवढया स्त्रिया असून यवतमाळ जिल्हयातील एकूण लोकसंख्येच्या २१.४६% आदिवासींची लोकसंख्या आहे. एकूण आदिवासी लोकसंख्येतील ९३.७५ %(४१७,९६५) लोक ग्रामीण भागात राहत असून राहिलेली ६.२५% (२७८७५) लोकसंख्या शहरी भागात राहतात.

## १. यवतमाळ जिल्हयातील आदिवासींच्या समस्या :-

यवतमाळ जिल्हयातील आदिवासी समाजात दुर्गम भागातील वास्तव्य, प्रगत समाजाशी संपर्क, प्रस्थापित बाहयसमुहाद्वारे शोषण, प्रशासकीय हस्तक्षेप, शहरीकरण या व इतर कारणांच्या परिणामातून समस्या उदभवल्या आहेत. आदिवासी कल्याण कार्यक्रमाद्वारे आदिवासींच्या समस्यांचे निर्मूलन करण्याचे जोरदार प्रयत्न शासनामार्फत सुरु आहेत. याशिवाय अनेक समाजसेवी संस्था व संघटनाही आदिवासींच्या समस्यांचे निर्मूलन करण्याचे प्रयत्न करीत आहेत. अशी स्थिती असूनही अद्याप यवतमाळ जिल्हयातील आदिवासी जमातीत अनेक समस्या दिसतात.

### १. आर्थिक समस्या :-

यवतमाळ जिल्हयात सर्वसाधारणपणे असे दिसून येते की, शेती व शेतीशी संबंधित कामे हा आदिवासींचा प्रमुख आर्थिक स्त्रोत आहे. बहुतांश आदिवासी लोकांचा उदरनिर्वाह शेती व शेतमजुरीवर अवलंबून आहे. केळापूर तालुक्यातील सर्वेक्षण केलेल्या गांवातील आदिवासी जमाती या बहुतांश प्रमाणात शेतकरी व शेतमजूर आहेत. परंतू आदिवासी कुटुंबे पूर्णतः एकाच व्यवसायावर अवलंबून असल्याचे आढळत नाही. कारण बहुतांश आदिवासींचा एकाच उत्पन्नस्त्रोतावर वर्षभर निर्वाह होणे शक्य नाही. केळापूर तालुक्यातील आदिवासींचा मुख्य व्यवसाय शेती, मोलमजुरी जंगलातील कामे, धंदा, नोकरी इतर कार्य जरी असला तरी जोडधंदा म्हणून जंगलातील किरकोळ वनौपज गोळा करणे, जंगलकाम, शिकार, मासेमारी, चराई, कोंबडया, शेळीपालन याशिवाय मिळेल ती कामे आदिवासी करतात.

नमुना निवड करण्यात आलेल्या आदिवासींचा व्यवसायविषयक माहिती दर्शक तक्ता क्र.१ पुढीलप्रमाणे आहे.

### आदिवासींचे उत्पन्नाचे स्त्रोत दर्शविणारा तक्ता क्र.१

| अ.क्र. | उत्पन्नाचे स्त्रोत | आदिवासी कुटुंब संख्या | उत्पन्न टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | शेतमजुरी | १९० | ३८% |
| २. | शेतमजुरी | १७० | ३४% |
| ३. | जंगलातील कार्य | ५९ | ११.८% |
| ४. | पशुपालन/कुक्कुटपालन | ३६ | ७.२% |
| ५. | धंदा | ४ | ०.८% |
| ६. | नोकरी | १७ | ३.४% |
| ७. | इतर कार्य | २४ | ४.८% |
| **एकूण** | | **५००** | **१००%** |

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, शेती करणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या १९० (३८%) असून शेतमजुरीवर १७० (३४%) कुटुंबे आहेत. जंगलातील कार्य व वनौपज गोळा करणे व विकणे इत्यादी प्रकारची कामे करणाऱ्या आदिवासींची संख्या ५९ (११.८%) आहे. पशुपालन/कुक्कुटपालन करणारे ३६ (७.२%), धंदा४ (०.८%) तर सरकारी नोकरीमध्ये १७ (३.४%) तर इतर स्वरुपाची कामे करणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या ही २४ (४.८%) एवढी आहे.

यावरुन असे दिसून येते की, शेती व शेतमजुरीवर अवलंबून असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या ३६० (७२%) आहे. म्हणजे बहुसंख्यने आदिवासी जमात ही शेती व शेतमजुरीवर अवलंबून आहे व बहुसंख्य आदिवासींना उत्पन्नाचे प्राथमिक स्त्रोत हेच आहे. जंगलातील कार्य, पशुपालन, धंदा, नोकरी व इतर कार्य करणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या १४० (२८%) आहे. २८% आदिवासी कुटुंबांचे उत्पन्नाचे प्राथमिक स्त्रोत हे शेती व शेतमजुरी व्यतिरिक्त दिसून येते. यात धंदा करणा-या आदिवासींचे प्रमाण नगण्य स्वरुपाचे ०४ (०.८%) आहे.

शेती-शेतजमीन हा आदिवासी जमातींच्या अर्थव्यवस्थाचा कणा आहे. जरी शेती उपयोगी जमीन बऱ्याच आदिवासी कुटुंबाजवळ आहे तरी आदिवासी शेतकऱ्याचे प्रमाण कमी आहे. बहुतेक आदिवासींची जमीनधारणा ३ एकर क्षेत्राचे आत आहे. तरीसुध्दा आदिवासीमध्ये शेती व्यवसाय हा प्रधान स्वरुपाचा आहे.

## नमुना निवड करण्यात आलेल्या आदिवासीजवळ असणाऱ्या शेतीची माहिती देणारा तक्ता क्र.२

| अ.क्र. | आदिवासींच्या जमिनीचे आकार (जमिन एकरमध्ये) | आदिवासी जमीन जमीनधारकाची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | ०-१.०० | ३० | १५.७८% |
| २. | ०१.०१-२.०० | ४० | २१.०५% |
| ३. | २.०१-३.०० | ५५ | २८.९५% |
| ४. | ३.०१-४.०० | २५ | १३.९६% |
| ५. | ४.०१ ते ५.०० | २३ | २०.११% |
| ६. | ५.०१ ते वरील जमीन | १७ | ८.९५% |
| **एकूण** | | **१९०** | **१००%** |

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, १२५ (६५.७८%) आदिवीस कुटुंबाजवळ असणारी जमीन ही तीन एकरपर्यंत ४८ (२५.२६%) आदिवासी कुटुंबांजवळ ५ एंकर पर्यंत जमीनधारणा आहे. तर ५ एकरच्या वर असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या १७ (८.९५%) आहे.

(अ) आदिवासी कुटुंबाचे उत्पन्न (Income Pattern) यवतमाळ जिल्हयातील आदिवासींच्या उत्पन्नाचे चित्र हे निरुत्साह करणारे आहे. आदिवासींचे उत्पन्नाचे सर्व स्त्रोतापासून प्राप्त होणारे उत्पन्न हे अत्यंत कमी आहे. आदिवासी कुटुंबांच्या उत्पन्नाच्या काढलेल्या सरासरीवरुन असे दिसून येते की, जिल्हयातील बहुतांश आदिवासींचे वार्षिक उत्पन्न रु.१५,०००/- रुपये एवढे आहे. १९९६-९७ च्या बेंचमार्क सर्वेक्षणाच्या आधारे यवतमाळ जिल्हयातील ३६५६१ आदिवासी जमातींच्या कुटुंबापैकी ३३५६२ (९१.७९%) आदिवासी कुटुंबे दारिद्रय रेषेखालील आहे.

### आदिवासी कुटुंबांची वार्षिक उत्पन्नानुसार वर्गवारी दर्शविणारा

### तक्ता क्र.३

| अ.क्र. | उत्पन्न मर्यादा रुपयांत | आदिवासी कुटुंब संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | ४८०१ ते ७००० पर्यंत | ८४ | १६.०८ |
| २. | ७००१ ते ११००० पर्यंत | १०६ | २१.२ |
| ३. | ११००१ ते १५००० पर्यंत | १६१ | ३२.२ |
| ४. | १५००१ ते १८००० पर्यंत | ६९ | १३.८ |
| ५. | १८००१ ते २१००० पर्यंत | ३६ | ७.२ |
| ६. | २१००१ ते २५००० पर्यंत | २३ | ४.६ |
| ७. | २५००१ चे वरील | २१ | ४.२ |
| **एकूण** | | **१९०** | **१००%** |

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, ८४ (१६.८%) आदिवासी कुटुंबे ४८०० ते ७००० रुपयापर्यंत वार्षिक उत्पन्न मिळविते तर (२१.२%) १०६ आदिवासी कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न ७००१ ते ११००० रुपयापर्यंत आहे. (३२.२%) १६१ आदिवासी कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न १५००१ ते १८००० रुपयापर्यंत आहे. ३६ (७.२%)आदिवासी कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न १८००० ते २१००० रुपयापर्यंत आहे. २१००१ ते २५००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्याचे प्रमाण कमी म्हणजे २३ (४.६%) असून २५००१ चे वरील उत्पन्न मिळविणाऱ्या आदिवासींची संख्या २१ (४.२%) आहे.

वरील आकडेवारीवरुन असे दिसून येते की, ८४ टक्के आदिवासी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न १८००० रुपयांचे आंत आहे. यावरुन यवतमाळ जिल्हयातील आदिवासींची आर्थिक परिस्थिती दयनीय आहे, असे दिसते. दारिद्रय रेषेखालील असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या बहुसंख्येने आहे.

## (ब) खर्च (Expenditure Pattern of Households)

### आदिवासी कुटुंबांचा होणारा खर्च दर्शविणारा तक्ता क्र.३

| अ.क्र. | आदिवासी कुटुंबांच्या खर्चाचे विवरण | आदिवासी कुटुंबाचा सरासरी खर्च | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | शेतीसाठी गुंतवणूक | २७०० | १८.७५ |
| २. | अन्नासाठी खर्च | ५७०० | ३९.५८ |
| ३. | कपडे | १५६० | १०.८४ |
| ४. | दवाखाना (आरोग्य) | ६०० | ४.१६ |
| ५. | शिक्षण | १०८० | ७.५ |
| ६. | व्यसन | १४४० | १०.०० |
| ७. | मनोरंजन | २४० | १.६६ |
| ८. | सामाजिक धार्मिक कार्य | ३०० | २.०८ |
| ९. | सण उत्सव | ४८० | ३.३४ |
| १०. | इतर खर्च | ३०० | २.०८ |
| | **एकूण** | **१४४००** | **१००%** |

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, यवतमाळ जिल्हयातील आदिवासी कुटुंबाचा वार्षिक सरासरी खर्च १४४०० रुपये आहे. म्हणजे प्रत्येक दिवसाचा खर्च साधारणत: ३९.४५ रुपये एवढा आहे. या आकडयाच्या सरासरीवरुन आदिवासीचे जीवनमान खालावलेले दिसून येते. शेतीसाठी २७०० रुपये (१८.७५%), अन्नासाठी ५७०० रुपये (३९.५८%), कपडे १५६० रुपये (१०.८३%), दवाखाना/आरोग्य ६०० रुपये (४.९६%), शिक्षण १०८० रुपये (७.६%), व्यसन खर्च १४४० (१०.०%), मनोरंजन २४० रुपये (१.६६%), सामाजिक धार्मिक खर्च ३०० रु. (२.०८ %) होतो. यावरुन असे दिसून येते की, उत्पन्नाचा मोठा हिस्सा ५७०० रुपये (३९.३८%) हा अन्नावर खर्च होतो. उत्पादक बाबीवर केवळ २७०० रुपये (१८.७५%) खर्च केला जातो. आदिवासी जमातीच्या अनुत्पादक बाबीवर मोठया प्रमाणावर खर्च होतो. वरील खर्चाच्या प्रमाणाच्या आधारे असा निष्कर्ष निघतो की, आदिवासींच्या जीवनात जुन्या रुढी प्रथा, परंपराची महत्वपूर्ण भूमिका

आहे. कारण सामाजिक, धार्मिक कार्य सण, उत्सव, मनोरंजन इत्यादीवर होणारा खर्च १९.१६ % एवढा आहे.

यवतमाळ जिल्हयातील आदिवासी शेती करणे, शेतमजुरी करणे, शिकार करणे, मासेमारी किंवा वनौपज गोळा करणे यासारखा कोणताही व्यवसाय करीत असले तरी त्या व्यवसायातील उत्पादन अत्यंत अपुरे असते. कारण ते आपल्या व्यवसायात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर फारसा करतांना दिसून येत नाही. म्हणून अपुरे उत्पादन व त्यामुळे येणारे दार्रिद्रय ही त्यांची प्रमुख आर्थिक समस्या आहे. आर्थिक व्यवहार, बाजारपेठा, वजनमापे या सर्व बाबीबाबत आदिवासी जमातीमध्ये कमालींचे अज्ञान व भोळेपणा आहे. त्यांच्या भोळेपणाचा फायदा ठेकेदार, सरकारी नोकर, इत्यादी लोक घेतात. त्यांचे कामाचा भाग्य मोबदला न देता त्यांना अल्पवेतन देऊन बेठबिगारप्रमाणे त्यांच्याकडून कामे करवून घेतात. त्यामुळे आर्थिक शोषण व कर्जबाजारीपणा हया त्यांच्या आर्थिक समस्या आहे.

## २. सामाजिक व सांस्कृतिक समस्या (Social and Culture Problem)

### (अ) अंधश्रध्दा

यवतमाळ जिल्हयातील गोंड, परधान, आंध, पारधी, कोलाम इत्यादी आदिवासी जमातीत अंधश्रध्दा मोठया प्रमाणावर दिसून येते. आदिवासींच्या अंधश्रध्देचा मागोवा घेतला असता असे आढळून आले की, भूतप्रेत, जादुटोणा, मंत्रतंत्रावर त्यांचा पूर्ण विश्वास आहे, असे सांगणारे १६५ (३३%) निवेदक आहेत तर यावर काही प्रमाणात विश्वास असणारे २०० (४०%) निवेदक आहेत. तर मंत्रतंत्र, भूतप्रेत, जादुटोणा यावर मुळीच विश्वास नसणारे १३५ (२७%) आदिवासी आहेत. याचा अर्थ आदिवासी लोकांमध्ये अंधश्रध्देविषयी जाणीव निर्माण झाली आहे, असे स्पष्ट दिसते.

आदिवासीमध्ये मंत्रतंत्र विद्येच्या काही शाखा रुढ व प्रचलित आहेत. उदा.सर्पदंशावर उपचार करणारी मंत्रशाखा **धनात्री** म्हणून रुढ आहे. अंगात नागशक्ती संचारित करणे दंश झालेल्या इसमावरील विषाला मंत्रशक्तीने प्रतिबंध करणे व त्यास विनाऔषध बरे करणे, ही धार्मिक जबाबदारी समजून विनामूल्य सेवा धनात्री देतो. अशाप्रकारे काळभैरव शाखा, भिराटी, तांदळी, नटक्यासूर अशा मांत्रिकांच्या शाख आहेत. याशिवाय मोहिनी विद्या, नजरबंदी, हिंस्त्र प्राण्याची दाढ बांधणे किंवा किम करणे, ठनका करणे अशा लहानसहान मंत्रतंत्रात्मक विद्याशाखा गोंड लोकांमध्ये रुढ आहेत.

आजारी पडल्यास उपचार घेण्यासाठी २८८ (५७.६%) निवेदक डॉक्टरकडे जातात तर ६३ (१२.६%) आदिवासी वैद्याकडे उपचार घेतात तर १४९ (२९.८%) लोक मांत्रिक व तांत्रिकांकडे उपचार घेतात. जिल्हयात आरोग्याच्या सुविधा शासनाने उपलब्ध

करुन दिल्या असल्या तरी मांत्रिक व तांत्रिक यांच्याकडे जाणाऱ्या आदिवासींचे प्रमाण २९.८% दिसून येते. मांत्रिकांची सेवा आदिवासी त्या त्या पध्दतीनुसार पैसा किंवा वस्तु स्वरुपात नवस देऊन किंवा विनामूल्य घेतात यात १३ (८.७२%) निवेदक मांत्रिकांची सेवा पैसे देऊन घेतो असे सांगतात. तर ८७ (५८.३८%) निवेदक नवस देऊन मांत्रिकाची सेवा घेतात. असे दिसते तर ४९ निवेदक (३२.८८%) आदिवासी मांत्रिकाची सेवा विनामूल्य घेतात. एकूण निवेदकांपैकी १४९ आदिवासी निवेदक आजारी पडल्यास मांत्रिकाकडे जातात.

देव हा अदृश्य व शक्तीशाली आहे या मताशी ३४५ (६९%) निवेदक पूर्णपणे सहमत आहे तर ५१ (१०.२%) निवेदक काही प्रमाणात सहमत आहेत. १०४ (२०.८%) लोक देव अदृष्य व शक्तीशाली आहे हे मानत नाही. देवाला प्रसन्न करण्यासाठी बळी देतो असे म्हणणारे २७२ निवेदक असून त्यांचे प्रमाण (५४.४%) एवढे आहे. त्यात कोंबडयाचे बळी देणारे १९३ (७०.९६ %) तर बोकडाचा ५९ (२१%) तर इतर स्वरुपाचा शाकाहारी नैवेद्य देणाऱ्याचे प्रमाण २० (७.३५%) एवढे आहे. बळी देण्याचा मुख्य उद्देश परंपरागत दिन चालू आहे. म्हणून बळी देतो सांगणारे १९६ (७२.०६%) निवेदक आहेत. तर ७६ (२९.९४%) आदिवासी लोक समस्या निवारण्यसाठी बळी देतात. यावरुन आदिवासीमध्ये बळी देणाऱ्याचे व नवस करण्याचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते. शाकाहारी नवस करण्याचे प्रमाण अगदी कमी आहे.

आजही यवतमाळ जिल्हयात काही आदिवासी जमातीमध्ये देव आंघोळीला जाताना स्त्रियानी त्यांच्या समोरुन जाऊ नये, त्याचप्रमाणे काळा कपडा न लावणे, नवस करणे, भूताने झपाटणे, मुठ मारणे, अशा असंख्य अंधश्रध्दा दिसून येतात. अगदीच संपर्कापासून दूर असणाऱ्या व्यवस्थेच्या, प्रशासनाच्या अथवा शहरी संपर्कापासून दूर असणाऱ्यांमध्ये अंधश्रध्दा मोठया प्रमाणावर दिसून येतात.

### (ब) व्यसनाधीनता

यवतमाळ जिल्हयातील आदिवासींमध्ये व्यसनाधितेची समस्या प्रामुख्याने दिसून येते. आपण नशापाणी करता काय ? या प्रश्नाला प्रतिसाद देताना ३४० (६८%) निवेदक नशापाणी करतात असे सांगतात, तर १६० (३२%) निवेदक नशापाणी करीत नाही हे ठामपणे सांगतात.यावरुन जिल्हयात व्यसनाधिन व्यक्तीचे प्रमाण जास्त आहे हे स्पष्ट होते. व्यसनाधीन असणाऱ्या ३४० (६८%) निवेदकामध्ये नेहमी व्यसन करणारे, २० (५९.१२%) निवेदक आहेत. कधीकधी नशापाणी करणाऱ्या आदिवासींचे प्रमाण ५२ (१५.३०%) एवढे आहे. सण, समारंभाच्या वेळी नशापाणी करणाऱ्यांची संख्या जास्त आहे. तसेच सण, उत्सव व धार्मिक विधीच्या वेळी नशापाणी केले जाते, हेही यावरुन स्पष्ट होते.

दारुचे व्यसन असणारे आदिवासी मोह फुलांपासून तयार करण्यात येणाऱ्या दारुचा सर्रास वापर करतात. याला **मोहाची दारु** असे म्हणतात. त्याचबरोबर बिडी, तंबाखू, गांजा, भांग याचे सेवनही काही प्रमाणात दिसते. परंतू शहरी वातावरणाशी जे काही इतर व्यसन प्रचलित आहेत, याची लागण या वर्गाला झाली नाही. अलिकडे मोहाची दारु गाळणे, दारुबंदी कायद्यामुळे धोक्याचे असल्यामुळे देशी दारु पिण्याचे प्रमाण वाढत आहे. दुसऱ्या बाजूला शिकलेल्या व इतरांच्या संपर्कात आलेल्या आदिवासी व्यक्तीमध्ये दारु पिण्याचे प्रमाण कमी होत आहे. केळापूर तालुक्यातील तातापूर या ३० ते ४० कोलाम लोकवस्ती असणाऱ्या कोलाम पाडयावर कोणीही दारु पित नाही. **कोलांमांनी स्वंयस्फुर्तीने दारुबंदी घडवून आणली आहे. हे एक आदर्श** उदाहरण आहे. जिल्हयातील आदिवासीमध्ये तंबाखू खाण्याचे प्रमाण मोठया प्रमाणावर दिसते. धर्मिक समारंभाच्या वेळी दारुचा सर्रास वापर होतांना दिसतो. अतिरेकी मद्यप्राशनातून भांडखोर स्वभाव, कार्यक्षमतेचा ऱ्हास व इतर प्रकारचे आजार हे दुष्परिणाम दिसून येतात. मद्यावर त्यांचा खूप खर्च होतो. अशा परिस्थितीत आर्थिक हानी होते व गरीबीचे प्रमाण वाढते. आदिवासींची व्यसनाधिनता ही यवतमाळ जिल्हयातील महत्वाची व गंभीर समस्या आहे.

### (क) वधूमूल्याचे जटील स्वरुप :

आदिवासी समाजात वधूमूल्याची पध्दती सार्वत्रिक दिसते. वधूमूल्य अन्नधान्य व मद्याच्या स्वरुपात देण्याचा प्रघात होता. परंतू पुढे मुद्रेच्या प्रबलनामुळे वधुमूल्य रोख रकमेच्या स्वरुपात मागितले जाऊ लागले. वधुमूल्याची रक्कम वाढू लागली. आर्थिक अडचणीमुळे वरास कन्यामूल्य देणे कठीण जाऊ लागले. त्यातूनच विवाहासंबंधी अनेक समस्या निर्माण झाल्या.

श्रीमती गोदावरी परुळेकर यांनी **जेव्हा माणूस जागा होतो** या ग्रंथांत वधूमूल्यामुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीचे उत्कृष्ट चित्रण केले आहे. अनेक कुटुंबात केवळ वधुमूल्य पध्दतीमुळे कर्जबाजारीपणा निर्माण झाला आहे.

### (ड) भाषा विषयक समस्या :-

यवतमाळ जिल्हयातील प्रत्येक आदिवासी जमातीची स्वतंत्र भाषा आहे. उदा.कोलामांची **कोलामी** , गोंडाची **गोंडी भाषा** इत्यादी आदिवासी जमाती स्वतःच्या भाषेच्या जोडीला सभ्य समाजाची भाषा बोलू लागला आहे. इतर समाजाची भाषा शिकण्यासोबतच त्याच्या मूळभाषेचा त्यांना दिवसेंदिवस विसर पडत आहे असे दिसते. दैंनदिन व्यवहारात बोलीभाषेचा वापर करण्याचे प्रमाण २७९ (५५.८०%) आहे तर बोलीभाषेचा वापर न करणाऱ्यांचे २२१ (४४.२%) निवेदक आहेत. आपल्या

बोलीभाषेचा वापर न करणाऱ्या २२१ निवेदकापैकी ३८ (१७.२०%) आदिवासींना त्यांच्या स्वतःच्या भाषेच्या वापराची आवश्यकता वाटत नाही. तर १३४ (६०.६३%) निवेदकांना त्यांची भाषा नीट बोलता येत नाही. ४९ (२२.१७%) निवेदक सभ्य समाजाची भाषा बोलणे योग्य समजतात. शहरी भागाशी समरस झालेल्या लोकांमध्ये मराठी, हिंदी भाषा बोलणाऱ्याचे प्रमाण जास्त आहे. गांवातील आदिवासी सर्वसाधारणपणे मराठी भाषेचाच वापर करताना दिसतात. त्यामुळे मूळभाषेचा विसर बऱ्याच आदिवासी कुटुंबांना पडू लागला आहे. आदिवासीमधील नवीन पिढी ही अन्य समाजाची भाषा शिकून तयार होत आहे. परिणामी आदिवासी समाजातील दोन पिढयात सांस्कृतिक देवाणघेवाणीत अडथळा निर्माण होऊ लागला आहे.

### (इ) युवागृहाचा ऱ्हास

आदिवासी समाजात युवागृह ही सामाजिक संघटना एक महत्वपूर्ण संस्था समजली जाते. त्याला **गोटुल** असे म्हणतात. तरुण मुले, मुली असलेल्या १४० निवेदकांना आपली तरुण मुले, मुली **गोटुल** मध्ये जातात काय ? असे विचारले असता ९२ (६५.७२%) आदिवासी कुटुंबांतील युवा हे गोटूल मध्ये जात नाही असे दिसून येते. यावरुन हे स्पष्ट होते की, आदिवासीमधे असणारी **युवागृह किंवा गोटुल** या सामाजिक संस्थेची आवश्यकता आदिवासी जमातीमध्ये कमी होत आहे. परिणामी युवागृहाचा ऱ्हास हळूहळू होत आहे, ही एक महत्वपूर्ण समस्या आहे. आदिवासी समाजात युवागृहाची जागा घेणारी दुसरी कोणतीही इतर सामाजिक संस्था निर्माण झाली नाही.

### (फ) कलांचा ऱ्हास

कला व मनोरंजन हे दोन्ही संस्कृतीचे घटक आहे. पुरातन काळापासून मानव कोणत्या न कोणत्या तरी प्रकारे स्वतःबरोबर इतरांचे मनोरंजन करीत आला आहे. मानवी समाजाच्या उदयापासून विनोदाचा इतिहास सुरु झाला आहे.

मानवी जीवनात मनोरंजनाला अत्यंत महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. जीवन समृध्द करण्यासाठी माणसाला मनोरंजन हवे असते. ते नसेल तर त्याचे जीवन नीरस बनते. आदिवासी जमातही याला अपवाद नाही. मुळात शारीरीक कष्ट करणारा हा समुदाय आहे. शारिरीक कष्टामुळे त्याच्या जीवनात निराशा निर्माण होत असते. ती दूर करण्यासाठी काहीतरी विरंगुळा पाहिजे असतो. हा विरंगुळा ते नृत्य करुन मिळवितात. त्यांच्यात ढेमसा, दंडार इत्यादी नृत्य प्रकार आढळतात.

आदिवासी पारंपारिक नृत्य करता येणारे ३६८ (७३.६%) निवेदक असून १६२ (३२.०४%) निवेदकांना आदिवासींचे पारंपारिक नृत्य येत नाही, असे सांगतात.

आधुनिक समाजाशी संपर्क व मनोरंजनाचे इतर साधने उदा.रेडिओ,

टी.व्ही.टेप इत्यादीमुळे पारंपारिक नृत्याकडे दुर्लक्ष होत आहे, असे दिसून येते.

आदिवासींच्या विविध हस्तकले पैकी एखादी हस्तकला येणारे १४७ (२९.४%) निवेदक आहेत. परंतू आदिवासींच्या पारंपारिक हस्तकलेपैकी एकही हस्तकला येत नसणारे ३५३ निवेदक आहेत.

आदिवासींचे प्राचीन काळपासून चालत आलेल्या हस्तकलेचा आता या समाजात हळूहळू विसर पडत चालला आहे. हे यावरुन स्पष्ट होते. सांस्कृतिक दृष्ट्या विचार केल्यास ही बाब गंभीर स्वरुपाची आहे. आजवर आदिवासींना त्यांचे संगीत, समूहनृत्य, चित्रकला, लाकडावरील कोरीव काम इत्यादी कौशल्य जपले होते. परंतू आधुनिक समाजाच्या संपर्कामुळे परंपरागत कला आदिवासी समाजातून लोप पावत असल्याचे दिसून येते.

## ३. आरोग्य विषयक समस्या

यवतमाळ जिल्हयातील आदिवासींची आरोग्यविषयक जाणीव पाहत असताना आजारी पडल्या उपचारासाठी कोणाकडे जाता असा प्रश्न निवेदकांना करण्यात आला त्याला २८८ (५७.०६%) निवेदकांनी डॉक्टरांकडे जातो असे सांगितले तर ६३ (१२.६%) निवेदक वैद्याकडे जातात तर १४९ (२९.८%) आदिवासी उपचारासाठी मांत्रिकाकडे जातात. जिल्हयात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्र, फिरते रुग्णालय अशी वैद्यकीय सेवा उपलब्ध आहे. तरी पण शासकीय रुग्णालयाची आरोग्यासाठी सेवा घेणाऱ्या आदिवासींची संख्या समाधानकारक दिसून येत नाही. मांत्रिक, तांत्रिक, वैद्याची सेवा व वनौषधीचा वापर करुन घरगुती स्वरुपाचे इलाज करणा-याचे प्रमाण २१२ (४२.४%) आहे.

आदिवासींच्या जीवनात येणारे बरेवाईट क्षण हे ईश्वरावर अवलंबून असून त्यासाठी ते पूजापाठ नवस प्रार्थना करतात. आत्मवाद व निसर्गवाद या त्यांच्या निसर्ग विषयक कल्पना धर्माच्या माध्यमातून ते व्यक्त करीत असतात. म्हणूनच आजारपणात ते डॉक्टरपेक्षा भगत व मांत्रिकावर अधिक विश्वास ठेवतात.

तक्ता क्र.५

## यवतमाळ जिल्हयातील आरोग्य सेवा याची माहिती

| अ.क्र. | तालुका | ग्रामीण रुग्णालये | प्रा.आ.केंद्र | उपकेंद्र | प्रा.मा. | फिरती रुग्णालये |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मारेगांव | १ | ४ | १६ | -- | -- |
| २. | यवतमाळ | -- | २ | ६ | -- | -- |
| ३. | बाभुळगांव | -- | -- | १ | -- | -- |
| ४. | कळंब | -- | १ | १० | १ | १ |
| ५. | राळेगांव | १ | २ | ३ | -- | -- |
| ६. | केळापूर | १ | ४ | ५ | -- | -- |
| ७. | घाटंजी | -- | २ | ४ | -- | -- |
| ८. | महागांव | -- | -- | -- | -- | -- |
| ९. | उमरखेड | -- | २ | ४ | -- | -- |
| १०. | दिग्रस (N.T.) | -- | -- | १ (T) | -- | -- |
| ११. | दारव्हा (N.T.) | -- | -- | -- | -- | १ |
| | एकूण | ०३ | १९ | ६० | १ | २ |

स्त्रोत आधार- आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

## तक्ता क्र.६

## आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आरोग्य सेवा/सुविधांतर्गत मंजूर केलेल्या पदांबाबत माहिती

| अ. क्र. | संवर्गाचे नांव | ग्रामीण रुग्णालय | | | प्राथमिक आरोग्य केंद्र | | | प्राथ.आरोग्य उपकेंद्र | | | फिरते आरोग्य पथक | | | प्रा.आरोग्य प्रथक | | | अंगणवाडी केंद्र | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मंजूर | भरलेले | रिक्त | मंजूर | भरलेले | रिक्त | मंजूर | भरलेले | रिक्त | मंजूर | भरलेले | रिक्त | मंजूर | भरलेले | रिक्त | मंजूर | भरलेले | रिक्त | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ |
| १. | वैद्यकीय अधिकारी वर्ग-१ | ३ | ३ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| २. | वैद्यकीय अधिकारी वर्ग-२ | ३ | ६ | - | ५८ | ५८ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ३. | वैद्यकीय अधिकारी वर्ग-३ | - | - | - | १७ | १६ | १ | - | - | - | २ | २ | - | १ | १ | - | - | - | - | - |
| ४. | परिचारिका | २२ | २० | ०२ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ५. | आरोग्य सहाय्यक | - | - | - | ८२ | ८२ | - | - | - | - | ०२ | ०२ | - | - | - | - | - | - | - | - |
| ६. | आरोग्य सहाय्यिका | - | - | - | ७४ | ७४ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ७. | आरोग्य सेवक | - | - | - | ८ | ६ | २ | १२८ | १०६ | २२ | ०२ | ०२ | - | ०१ | ०१ | - | - | - | - | - |

| अ. क्र. | संवर्गाचे नांव | ग्रामीण रुग्णालय | | | प्राथमिक आरोग्य केंद्र | | | प्राथ.आरोग्य उपकेंद्र | | | फिरते आरोग्य पथक | | | प्रा.आरोग्य प्रथक | | | अंगणवाडी केंद्र | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मंजूर | भरलेले | रिक्त | मंजूर | भरलेले | रिक्त | मंजूर | भरलेले | रिक्त | मंजूर | भरलेले | रिक्त | मंजूर | भरलेले | रिक्त | मंजूर | भरलेले | रिक्त | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ |
| ८. | आरोग्य सेविका | - | - | - | १४ | १४ | - | १६७ | १६७ | - | - | - | - | ०१ | ०१ | - | - | - | - | - |
| ९. | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ०३ | ०३ | - | ०८ | २२ | ०६ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| १० | क्ष किरण तंत्रज्ञ | ०२ | ०२ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ११. | मिश्रक | ०४ | ०४ | - | ५० | ४८ | ०२ | - | - | - | - | - | - | - | ०१ | ०१ | - | - | - | - |
| १२ | वाहनचालक | ०६ | ०६ | - | ३२ | २६ | ०६ | - | - | - | ०२ | ०२ | - | - | - | - | - | - | - | - |
| १३ | अंगणवाडी सेविका | - | - | - | - | | - | - | - | - | - | - | - | - | =- | - | ५५६ | ५५२ | ४ | - |
| | एकूण | ४६ | ४४ | ०२ | ३६३ | ३४६ | १७ | २९५ | २०३ | २२ | ८ | ८ | - | ४ | ४ | - | ५५६ | ५५२ | ४ | - |

## तक्ता क्र.७

## आरोग्य सुविधा कार्यक्रमांतर्गत जिल्हयात उपलब्ध असलेल्या सुविधांची माहिती

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | ग्रामीण रुग्णालये | प्रा.आ.केंद्र | उपकेंद्र | फिरती आरोग्य पथक | प्राथमिक आरोग्य पथक | अंगणवाडी केंद्र | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ८ | ९ | १० | ११ |
| १. | यवतमाळ | यवतमाळ | ० | ५ | २४ | ० | ० | ७५ | |
| २. | | कळंब | १ | ३ | १९ | ० | १ | ७१ | |
| ३. | | घाटंजी | १ | ४ | १६ | ० | ० | ४८ | |
| ४. | | राळेगांव | १ | ४ | ११ | ० | ० | ३६ | |
| ५. | | मारेगांव | १ | २ | १० | १ | ० | २८ | |
| ६. | | झरी | ० | ३ | १४ | १ | ० | ८५ | |
| ७. | | पांढरकवडा | १ | ६ | २८ | ० | ० | १०४ | |
| ८. | | पुसद | १ | ६ | २८ | ० | ० | ४७ | |
| ९. | | उमरखेड | १ | ६ | १४ | ० | ० | ३० | |
| १० | | महागांव | १ | २ | ४ | ० | ० | १० | |
| ११. | | आर्वी | १ | ४ | ६ | ० | ० | ११ | |
| १२ | | वणी | १ | १ | १ | ० | ० | १ | |
| १३ | | दारव्हा | १ | १ | २ | ० | ० | २ | |
| १४ | | दिग्रस | १ | १ | १ | ० | ० | १ | |
| १५ | | नेर | १ | १ | १ | ० | ० | १ | |
| १६ | | बाभुळगांव | १ | १ | २ | ० | ० | ६ | |
| | **एकूण** | | **१४** | **५०** | **१८१** | **२** | **१** | **५५६** | |

स्त्रोत आधार- आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

यवतमाळ जिल्हयात वरीलप्रमाणे शासकीय आरोग्य सेवा असली तरी, बाभुळगांव, महागांव, दिग्रस या तालुक्यात आदिवासींना आरोग्यविषयक सवलतींचा लाभ मिळवून देण्यासाठी ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्र (PHC) उपकेंद्र (Subcentre), प्राथमिक आरोग्य केंद्र (PAV) फिरती रुग्णालये(MHU) यांची संख्या वाढविणे आवश्यक आहे.

आदिवासींना आरोग्याच्या सोयीचा लाभ घेताना काही प्रमुख अडचणी येतात. त्यात प्रामुख्याने प्राथमिक आरोग्य केंद्र गांवापासून दूर असते. रुग्णाला आरोग्य केंद्रापर्यंत घेऊन जाण्यासाठी योग्य त्या प्रवास साधनाचा व योग्य रस्त्याचा अभाव, डॉक्टरांनी नेमून दिलेल्या गांवात न राहणे इत्यादी अडचणी आरोग्य विषयक सेवांचा लाभ घेताना आदिवासींना येतात.

प्राथमिक आरोग्य केद्राकडे फिरते आरोग्य पथक, आवश्यक उपचार केंद्र, औषधांचा पुरेसा साठा, आधुनिक तंत्रज्ञान यांचा अभाव प्रामुख्याने दिसून येतो.

यवतमाळ जिल्हयात आदिवासी मध्ये आजही पारंपारिक पध्दतीने आजार बरा करण्याचा प्रयत्न दिसतो. आजार बरा करण्यासाठी स्थानिक भगत, मांत्रिक यांची मदत घेतात. मांत्रिकाकडे मानसिक आजारासाठी उपचार घेणाऱ्यांची संख्या जास्त आहे. भूतबाधा व देवाचा कोष या गोष्टीवर आदिवासींचा विश्वास आहे. यामुळेच आपण आजारी पडतो अशी त्यांची धारणा आहे हे यातून आपणास केवळ भगत, मांत्रिक वाचवू शकतो असा त्यांचा दृढ विश्वास आहे.

आदिवासीमध्ये कुपोषण, जुलाब, हिवताप, कावीळ, पावसाळयातील आजार, चिकनगुण्या इत्यादी रोग आहेत. थोडक्यात यवतमाळ जिल्हयातील आहारविषयक समस्या, अस्वच्छ राहणीमान, पिण्याच्या स्वच्छ पाण्याचा अभाव या कारणामुळे आदिवासीमध्ये आरोग्यविषयक समस्या दिसून येतात.

## ४. पिण्याच्या पाण्याची समस्या

यवतमाळ जिल्हया मधील आदिवासींची पिण्याच्या पाण्याची उपलब्धतेची महत्वाची समस्या आहे. जिल्हयात अनेक आदिवासी गांवात फलोराईड युक्त पाण्यामुळे अनेक समस्या दिसून येतात. यामध्ये प्रामुख्याने मंगी पोळ या गांवात फ्लोराईडयुक्त पाण्याचा दुष्परिणाम स्पष्टपणे दिसतो. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा, जि.यवतमाळ नवसंजीवन योजनेच्या माहे मार्च,२००४ च्या अहवालानुसार यवतमाळ जिल्हयातील १६ तालुक्यातील ५४० गांवातील पिण्याच्या पाण्याचे घेतलेल्या नमुन्यानुसार १११ (२०.५५%) गांवातील पाणी दूषित आढळून आले असून ६७ (१२.४०%) गांवाना ब्लिचिंग पावडर उपलब्ध झालेली

नाही. असुरक्षित पिण्याचे पाणी वापरल्या जाणाऱ्या गांवाची संख्या ६७ (१२.४०%) आहे. दूषित पिण्याच्या पाण्याची समस्या, यवतमाळ, कळंब, घाटंजी, राळेगांव, केळापूर, झरी इत्यादी तालुक्यात जास्त दिसून येते.

## तक्ता क्र.८

## दूषित पाण्याबाबत माहे मार्च,२००५ अखेर माहिती

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | गांवाची संख्या | पिण्याच्या पाण्याचे नमुने घेतलेल्या गांवाची संख्या | त्यापैकी दूषित पाणी आढळून आलेल्या गांवाची संख्या | ब्लिचिंग पावडर उपलब्ध नसलेल्या गांवाची संख्या | असुरक्षित पिण्याचे पाणी वापरणाऱ्या गांवाची संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १. | यवतमाळ | यवतमाळ | ७३ | ७३ | १७ | ६ | ६ | |
| २. | | कळंब | ६९ | ६९ | ११ | ४ | ४ | |
| ३. | | घाटंजी | ३५ | ३५ | ९ | ५ | ५ | |
| ४. | | राळेगांव | ३४ | ३४ | ८ | ४ | ४ | |
| ५. | | मारेगांव | २६ | २६ | ५ | ४ | ४ | |
| ६. | | झरी | ८५ | ८५ | १६ | ११ | ११ | |
| ७. | | पांढरकवडा | १०२ | १०२ | २१ | १६ | १६ | |
| ८. | | पुसद | ४६ | ४६ | ८ | ३ | ३ | |
| ९. | | उमरखेड | २९ | २९ | ७ | ६ | ६ | |
| १० | | महागांव | ९ | ९ | ३ | २ | २ | |
| ११. | | आर्वी | २१ | २१ | ५ | ४ | ४ | |
| १२ | | वणी | १ | १ | ० | ० | ० | |
| १३ | | दारव्हा | २ | २ | ० | ० | ० | |
| १४ | | दिग्रस | १ | १ | १ | १ | १ | |
| १५ | | नेर | १ | १ | ० | १ | १ | |
| १६ | | बाभुळगांव | ६ | ६ | ० | ० | ० | |
| एकूण | | | ५४० | ५४० | १११ | ६७ | ६७ | |

### स्वच्छतेची समस्या

'स्वच्छता' ही आदिवासीमधील महत्वाची समस्या आहे. स्वच्छताविषयक किंवा शौचालयाची समस्या मोठया प्रमाणात दिसून येते. जिल्हयात जिल्हा परिषदेमार्फत 'जलस्वराज्य' अंतर्गत 'हागणदारी मुक्त ग्राम' ही चळवळ मोठया प्रमाणात दिसून येते. त्यामुळे त्यांचे आरोग्य धोक्यात आले आहेत. प्रत्येक खेडयात स्वच्छतागृहाची सोय नसल्यामुळे लोक उघडयावर शौचास बसतात. त्यामुळे एकंदरीत त्या गांवाचे आरोग्य धोक्यात येते. शासनाने स्वच्छतागृह बांधून दिली असली तरीही बहुध्दा ते निरुपयोगी ठरलेले आहेतञ कारण बहुतेकांनी स्वच्छतागृहाचा वापर कडबा; कुटार ठेवणे, अडगडीचे सामान ठेवणे किंवा इतर स्वरुपाच्या उपयोगाकरिता केला आहे. बऱ्याच लोकांनी शौचालय दरवाजे न बसविल्यामुळे निरपयोगी ठरले आहेत. ज्यांनी स्वच्छतागृह बांधली नाहीत ते आर्थिक अडचणीचे कारण सांगतात. गांवातील सांडपाणी, गटार, मोकाट जनावरे, कोंबडया रस्त्यावर सोडलेले नालीचे पाणी, अस्ताव्यस्त वाढलेले बेशरम व गाजरगवताची झाडे, घरातील कचरा, उकीरडा या सोबतचे काही लोकामध्ये असणारी व्यक्तीगत स्वच्छतेबाबत अनास्था इत्यादी स्वच्छतेबाबतचे समस्या आढळून येतो.

### ६. शैक्षणिक समस्या

यवतमाळ जिल्हयात शिक्षणाच्या प्रसारासाठी शासन प्रयत्नशील असून शासन बालवाडया, प्राथमिक शाळा, पुस्तके व गणवेष वाटप इत्यादी विविध उपक्रम हाती घेत आहे. यवतमाळ जिल्हयात २०३२ प्राथमिक शाळा असून ३१९००० विद्यार्थी शिक्षणाचा लाभ घेत आहेत. ३५६ माध्यमिक शाळा २० कनिष्ठ महाविद्यालये, २८०९ प्रौढ शिक्षण केद्र, ९०, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, १७ मागास विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह व ८ मुलींसाठी ९ मुलांसाठी शासकीय वसतिगृह असून वि.ज.भ.ज.साठी २६ आश्रमशाळा अशी शैक्षणिक सोय केलेली आहे.

२००१ च्या जनगणनेनुसार यवतमाळ जिल्हयात सर्वसाधारणपणे साक्षरतेची टक्केवारी ७३.६ टक्के असून यात आदिवासीमधील साक्षरतेचे प्रमाण ६२.२ टक्के आहे. यात आदिवासी पुरुष साक्षरता ७४.३ टक्के असून आदिवासी महिला साक्षरतेचे प्रमाण ४९.५ टक्के आहे.

यवतमाळ जिल्हयात आदिवासी विकास विभागामार्फत व स्वयंसेवी संस्थामार्फत आश्रमशाळा, माध्यमिक आश्रमशाळा व वसतिगृह चालविण्यात येते. यात शासकीय आश्रमशाळा ५, अनुदानित आश्रमशाळा २१, माध्यमिक शासकीय आश्रमशाळा २०, अनुदानित

माध्यमिक आश्रमशाळा २१, शासकीय कनिष्ठ महाविद्यालये ३, अनुदानित कनिष्ठ महाविद्यालय ४, शासकीय वसतिगृह १७ आहेत.

शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील एका दृष्टिक्षेपात शिक्षण १९९९-२००० यानुसार यवतमाळ जिल्हयातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील प्राथमिक शाळा नोंदणी व शिक्षकांची माहिती पुढीलप्रमाणे आहे :-

**तक्ता क्र.९**

**यवतमाळ जिल्हयातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील प्राथमिक शाळा नोंदणी व शिक्षकांची माहिती सत्र १९९९ ते २०००**

| अ.क्र. | जिल्हा | एकूण संख्या | एकूण नोंदणी | शिक्षक | | प्रशिक्षित शिक्षकाची टक्केवारी | शिक्षक विद्यार्थी प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | एकूण | प्रशिक्षित | | |
| १. | यवतमाळ | ४७७ | ५७५९८ | १५८१ | १३६२ | ८६ | ३६ |

आदिवासीसाठी शिक्षणाच्या सोयी उपलब्ध असल्या तरी ज्या प्रमुख शैक्षणिक समस्या दिसतात. यात शाळेत दाखल झालेली आदिवासी मुलं, मुली वर्ष दोन वर्षात शिक्षण घेणे बंद करतात. शाळेत गळतीचे प्रमाण जास्त आहे. स्त्रियांचे शिक्षण घेण्याचे प्रमाण कमी आहे. तसेच निरक्षरतेचे प्रमाण आदिवासींमध्ये जास्त आहे. प्रत्येक आदिवासी जमातीची बोलीभाषा व मातृभाषा वेगळी आहे. त्यांच्या मातृभाषेत शैक्षणिक अभ्यासक्रम नाही. बऱ्याच आदिवासीची धारणा पैसा व वशिला नाही. त्यामुळे शिक्षण घेऊन फायदा नाही अशी उदासिनता दिसून येते. त्यामुळे शैक्षणिक बाबतीत त्यांच्यात उदासिनता निर्माण होत आहे.

## ७. राजकीय समस्या

यवतमाळ जिल्हया मधील आदिवासींचा राजकीय सहभागाचे प्रमाण मोठया प्रमाणावर आहे, असे दिसून येते. निवडणूकीच्या काळात मतदान प्रक्रियेत भाग घेण्याचे प्रमाण समाधानकारक आहे. परंतू जिल्हयातील आदिवासी समाजाचे राजकीय संस्था व संघटनामधील सभासद असल्याचे प्रमाण कमी आहे. तसेच आदिवासी लोकांचा आमदार व खासदार यांचेशी संपर्क फार कमी प्रमाणात येतो. आदिवासी राजकारणातील सहभाग कुठले तरी लाभ प्राप्तीचे आमिष दाखविले जात असल्यामुळे होते, असे निरीक्षणावरुन लक्षात येते. ३६१ (७२.०२ टक्के)

निवेदकांनी राष्ट्रीय नेते त्यांच्या हितसंबंधाचे रक्षण करीत नाही,असे म्हटले तर १३९ (२७.८ टक्के) निवेदक राष्ट्रीय नेते त्यांच्या हितसंबंधाचे रक्षण करतात असे सांगतात. यवतमाळ जिल्हयातील राजकीय विकास मोठया प्रमाणात घडून येण्यासाठी योग्य नेतृत्वाचा अभाव प्रामुख्याने जाणवतो. राजकीय नेतृत्वामुळे त्यांच्यामध्ये आधुनिक काळानुरुप परिवर्तन झाले नाही. असे उत्तर देणाऱ्या निवेदकांची संख्या ७८ टक्के (३९०) एवढी आहे. यवतमाळ जिल्हयातील आदिवासी जमातीच्या हितसंबंधाचे रक्षण करुन आधुनिक काळानुसार आवश्यक असणारे परिवर्तन त्यांच्यामध्ये घडवून आणणारे राजकीय नेतृत्व पुरेशा प्रमाणात विकसित झालेले नाही. सुयोग्य स्वरुपातील राजकीय नेतृत्वाचा अभाव असल्यामुळे आदिवासी भागात परिवर्तनाची तसेच विकासाची ती फार मंद आहे. ५०० पैकी २९२ (५८.४ टक्के) निवेदकाच्या मते यवतमाळ जिल्हयातील आदिवासींचे शैक्षणिक मागासलेपणा हे सर्वच क्षेत्रातील पिछाडीसोबत राजकीय क्षेत्रात सुध्दा आदिवासींना मागे पाडण्यास कारणीभूत आहे, असे मान्य केले आहे.

### ८. दळणवळण व संपर्क माध्यमाची समस्या :-

यवतमाळ जिल्हयात नवसंजीवन योजनेच्या कार्यक्षेत्रात ६३९ गांवे असून त्यापैकी ९८ उजाड गांवे आहेत. वहनी असणाऱ्या ५४१ गांवापैकी ३०४ गांवे बारमाही रस्त्याने जोडलेली आहेत. जिल्हयातील ४८ गांवे अतिदुर्गम म्हणून घोषित करण्यात आले असून त्यातील गंगापूर हे गांव उजाड आहे. उर्वरित ४७ गांवापैकी २० गांवे बारमाही रस्त्याने जोडलेली आहेत व ६ गांवामध्ये अजूनही रस्त्याचे काम व्हायचे आहे तर २१ गांवे आठमाही रस्त्याने जोडलेली आहेत.

#### (१) बारमाही रस्त्याने जोडलेले अतिदुर्गम गांवे

मुधारी, दुगर्डा, सुसरी, अर्जुनी पोड, केगांव, महादापूर, बिरसापेठ, निंबादेवी, सोनेगांव, पेंढरी, रोहोपट, वागदरा, खेरगांव, सुरला, मांडवी, कारेगांव बु., दाभडी, झंपोला, ढोल, डोंगरगांव, बोदनी

#### (२) न जोडलेली दुर्गम गांवे

मुंची, अंबाझरी खु. अंबेझरी बु.शेकापरू, कुंडी,मांडवा

जिल्हयात रस्ते विकासाच्या कार्यक्रमाच्या आधारे आदिवासी समाजाचा शहरी विभागाशी संपर्क सोपे जाईल असा प्रयत्न होत असला तरी प्रत्यक्षात खराब रस्त्याचा प्रश्न हा मोठा गंभीर स्वरुपाचा आहे. त्यामुळे दळणवळण व टपाल, तार, दूरध्वनी इत्यादी संपर्क माध्यम ही समस्या महत्वाची आहे.

थोडक्यात यवतमाळ जिल्हयातील आदिवासी जमातीच्या अनेक समस्या आहेत. त्या समस्यांचे निराकरण करणे आवश्यक ठरते. जोपर्यंत या समस्यांची

सोडवणूक होणार नाही तोपर्यंत शकणार नाही.
आदिवासींची सर्वांगीण प्रगती होऊ

**संदर्भ :-**


१. डॉ.बोबडे,लोटे :सामाजिक मानवशास्त्र, पिंपळापूर पब्लिशर्स, नागपूर १९९१, पृष्ठ क्र.२३६

२. कांचाळे, दा.धो :-ग्रामीण समाजशास्त्र,कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, १९९९, पृ.क्र.२९१

३. कांचाळे, दा.धो :-ग्रामीण समाजशास्त्र,कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, १९९९, पृ.क्र.१३९

४. तिजारे, रा.आ., धांगरेकर चि.ग. : आधुनिक राजकीय विश्लेषण, मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९४, पृष्ठ क्र.१४


* * *

# ठाणे जिल्हयातील मोखाडा तालुक्यातील वनखात्याच्या जागेत शेती करणा-या आदिवासीच्या समस्या.

* प्रा. डॉ. जे.एस. इंगळे

**प्रास्ताविक**

भारतातील अनेक राज्यात आदिवासींचे वास्तव्य असून यापैकी बहुसंख्य आदिवासी जंगल प्रदेशात आढळून येतात . हे आदिवासी सध्या ज्या काही उग्र प्रश्नांशी सामना करीत आहेत. त्यापैकी एक प्रश्न जंगलाशी संबधित असून हा प्रश्न त्यांच्या जीवन मरणाशी निगडीत आहे. आपल्या देशातील कित्येक आदिवासी सरकारी मालकीच्या जंगलात म्हणजे वन खात्याच्या जागेत शेती करतात. तर काही आदिवासी शेतीही करतात आणि तेथेच झोपडयाही बांधून राहतात. म्हणजे निवास सुध्दा करतात.

अशा प्रकारे अनेक वर्षापासून आदिवासी जंगलातील सरकारी मालकीच्या जागेत शेती व वास्तव्य करीत आहेत. याला आदिवासींचे सरकारी जागेवरील अतिक्रमण असे म्हणतात.

**संशोधन विषयाची उद्दिष्टे :-**

१. आदिवासी वन खात्याच्या जागेत शेती करतात. त्यामागची कारणे शोधणे.

२. वन खात्याच्या जागेत शेती करणाऱ्या आदिवासीना भेडसावणा-या समस्यांचा अभ्यास करणे.

३. आदिवासींना भेडसावणा-या समस्या नष्ट करण्यासाठी उपाय सुचवणे.

* असोसिएट प्राध्यापक आणि व्यावसायिक अर्थशास्त्र विभाग प्रमुख, अण्णासाहेब आवटे कॉलेज, मंचर, जि.पुणे

वन खात्याच्या जागेत घुसून म्हणजे अतिक्रमण करुन आदिवासी जी शेती करतात. त्यांचा अभ्यास करण्यासाठी ठाणे जिल्हयातील मोखाडा तालुक्याची निवड केली. कारण या तालुक्यात प्रस्तुत अभ्यासकाने काही वर्ष नोकरी केली असल्याने त्यास आदिवासीच्या विविध समस्यांची जाण होती. या जाणिवेतून प्रस्तुत अभ्यासकाने सन २००४ साली ठाणे जिल्हयातील मोखाडा तालुक्यातील विविध जमातीतील ४२० आदिवासी कुटुंबांचे पी.एच.डी. साठी प्रबंध तयार करण्यासाठी सर्वेक्षण केलेले होते. त्या सर्वेक्षणावर आधारित हा शोधनिबंध आहे. सर्वेक्षणात ४२० आदिवासी कुटुंबापैकी ९८ कुटुंबे वन खात्याच्या जागेत शेती करतात असे आढळून आले आहे. या ९८ कुटुंबाचा अभ्यास या शोधनिबंधात केला आहे. प्रस्तुत संशोधन विषय अभ्यास करण्यासाठी सहभागी निरीक्षण, चर्चा पध्दती आणि मुलाखत तंत्र या पध्दतीचा अवलंब केला आहे.

**वन खात्याच्या जागेत शेती करणा-या आदिवासीच्या समस्या :-**

वन खात्याच्या जागेत अतिक्रमण करुन शेती करणा-या आदिवासी कुटुंबाचे प्रमाण अतिक्रमणाची कारणे, समस्या आणि उपाय इत्यादी बाबतची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे दिली आहे.

वन खात्याच्या जागेतील शेतीबरोबर स्वतःची आणि खंडाची जमीन कसणा-या कुटुंबाचे प्रमाण :-

स्वतःच्या मालकीची शेती असणारे आणि दुस-याची जमीन खंडाने कसणारे आदिवासी सुध्दा वन खात्याच्या जागेत शेती करतात. गरीबी हे त्यामागचे प्रमुख कारण आहे. काही आदिवासी केवळ वनखात्याची जमीन कसतात. त्यांना स्वतःच्या मालकीची जमीन नाही. तसेच अवजारे नसल्याने त्यांना खंडाने जमीन मिळत नाही. खालील तक्यात वन खात्याच्या जागेत शेती करणा-या कुटुंबाचे प्रमाण दर्शविले आहे. :-

### तक्ता क्रंमाक ४.१

**वन खात्याच्या जागेतील शेतीबरोबर स्वत:ची आणि खंडाची जमीन कसणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण :-**

| अ.क्र. | घटक | कुटुंबाची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | स्वत:ची शेती असणारी वन खात्याची जमीन कसणारी आणि दुस-याची जमीन खंडाने कसणारी कुटुंबे | ०६ | ६.१२ |
| २. | वन खात्याची जमीन कसणारी आणि दुसऱ्याची जमीन खंडाने कसणारी कुटुंबे | १५ | १५.३० |
| ३. | स्वत:ची शेती असणारी आणि वन खात्याची जमीन कसणारी कुटुंबे | २५ | २५.५२ |
| ४. | वन खात्याची शेती कसणारी कुटुंबे | ५२ | ५३.०६ |
| | **एकूण** | **९८** | **१००** |

**प्राथमिक सर्वेक्षण**

वरील तक्यावरुनअसे दिसते की, वन खात्याच्या जागेत शेती करणा-या आदिवासी कुटुंबाची संख्या ९८ इतकी आहे. कुटुंबाचे प्रमाण २५.५२ टक्के इतके आहे. दुसऱ्यांची जमीन खंडाने कसणाऱ्या आणि वन खात्याची सुध्दा जमीन कसणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण १५.३० टक्के आहे. स्वत:ची शेती असणारी दुस-याची जमीन खंडाने कसणारी आणि वन खात्याची सुध्दा जमीन कसणा-या कुटुंबाचे प्रमाणे ६.१२ टक्के आहे. तर केवळ वनखात्याची जमीन कसणा-या कुटुंबाचे प्रमाण मोठे असून ते ५३.०६ टक्के इतके आहे. या कुटुंबाना स्वत:च्या मालकीची जमीन नाही. तसेच ही कुटुंबे दुस-याची जमीनही खंडाने कसत नाहीत.

**जमातीनुसार वन खात्याच्या जागेत शेती करणा-या आदिवासी कुटुंबाचे प्रमाण :-**

खालील तक्यात सन २००३.२००४ या सर्वेक्षणाच्या वर्षात मोखाडा तालुक्यातील किती आदिवासी कुटुंबे वन खात्याच्या जागेत शेती करत होते याची माहिती दिली आहे. ( ही

आदिवासी कुटुंबे अनेक वर्षापासून वन शेती करत असून पुढेही कायमपणे या जमिनी कसत राहणार असल्याचे आदिवासीनी चर्चे दरम्यान सांगितले.)

**तक्ता क्रंमाक ४.२**

**जमातीनुसार वन खात्याच्या जागेत शेती करणा-या आदिवासी कुटुंबाचे प्रमाण**

| अ.क्र. | जमातीचे नांव | वन खात्याच्या जागेत शेती कसणारी कुटुंबे | सर्वेक्षण केलेली कुटुंबे | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १. | महादेव कोळी | ०३ (३.०६) | ६० | ५.०० |
| २. | ढोर कोळी | ० | ६० | ० |
| ३. | कातकरी | १४ ( १४.२८ ) | ६० | २३.३३ |
| ४. | वारली | २३ (२३.४६ ) | ६० | ३८.३३ |
| ५. | कोकणा | २० (२०.४० ) | ६० | ३३.३३ |
| ६. | म.ठाकूर | ०२ (२.०४ ) | ६० | ३.३३ |
| ७. | क. ठाकूर | ३६ (३६.७३ ) | ६० | ६०.०० |
|  | एकूण | ९८ (१०० ) | ४२० | २३.३३ |

## प्राथमिक सर्वेक्षण

कंसातील आकडेही टक्केवारी असून ही टक्केवारी एका किंवा विशिष्ट जमातीतील वन खात्याची जमीन कसणाऱ्या आदिवासी कुटुंबाचे विविध सात जमातीतील वन खात्याची जमीन कसणाऱ्या एकूण ९८ आदिवासी कुटुंबाशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते. स्तंभ क्रमांक ५ मधील आकडे टक्केवारी असून ही टक्केवारी एका जमातीतील वन जमिनी कसणाऱ्या कुटुंबाचे त्याच विशिष्ट जमातीतील सर्वेक्षण केलेल्या एकूण कुटुंबांशी असलेले शेकडा प्रमाण दर्शविते.

वरील तक्यावरुन असे दिसते की, सर्वेक्षण केलेल्या ४२० आदिवासी कुटुंबापैकी ९८ कुटुंबे ( २३.३३ टक्के) वन खात्याची जमीन कसतात. विविध सात

जमातीचा तुलनात्मक दृष्ट्या विचार करता असे दिसते की, वन खात्याची जमीन कसणा-या कुटुंबाचे सर्वात जास्त प्रमाण क. ठाकूर या जमातीत असून ते ३६.७३ टक्के आहे. तर ढोरकोळी या जमातीत हे प्रमाण शून्य आहे.

अनेक जमातीचा स्वतंत्रपणे विचार करता असे दिसते की, क. ठाकूर जमातीतील ६० टक्के कुटुंबे वन खात्याच्या जागेत शेती करतात तर या जमातीतील ४० टक्के कुटुंबे वन खात्याच्या जागेत शेती करत नाहीत. वारली जमातीतील सर्वेक्षित ६० कुटुंबापैकी ३८.३३ टक्के कुटुंबे वन खात्याची शेती करतात. तर या जमातीतील ६१.६७ टक्के कुटुंबे वन खात्याच्या जागेत शेती करत नाहीत. कोकणा जमातीतील ३३.३३ टक्के कुटुंबे वन खात्याच्या जागेत शेती करतात. तर या जमातीतील ६६.६७ टक्के कुटुंबे वन खात्याच्या जागेत शेती करत नाहीत. कातकरी जमातीतील २३.३३ टक्के कुटुंबे वन खात्याच्या जागेत शेती करतात. तर ७६.६७ टक्के कुटुंबे वन खात्याच्या जागेत शेती करत नाहीत. महादेव कोळी जमातीतील ५.०० टक्के कुटुंबे वनखात्याच्या जागेत शेती करतात. तर ९५.०० टक्के कुटुंबे शेती करत नाहीत . म. ठाकूर जमातीतील ३.३३ टक्के कुटुंबे वन खात्याच्या जागेत शेती करतात. तर ९६.६७ टक्के कुटुंबे वनखात्याच्या जागेत शेती करत नाहीत.

**वन खात्याच्या जागेत शेती करण्याची कारणे :-**

वन खात्याच्या किंवा फॉरेस्टच्या जागेत अतिक्रमण करुन आदिवासी शेती करतात. याला वन खात्याचा अर्थातच आक्षेप असतो. आदिवासी वन खात्याच्या जागेत घुसून कायदा मोडून शेती का करतात. याची माहिती आढळून आलेली नाही. कारणे थोडक्यात खालीलप्रमाणे दिली आहेत.

**दारिद्रय :-**

आदिवासी वन खात्याच्या जागेत अतिक्रमण करुन शेती करतात. त्यास विविध घटक कारणीभूत आहेत. त्यामध्ये

दारिद्रय हा एक प्रमुख घटक आहे. सर्वेक्षण केलेल्या आणि वन जमिनी कसणा-या विविध जमातीतील ८० टक्केपेक्षा अधिक कुटुंबे दारिद्रय रेषेखालील असल्याचे अभ्यासात आढळले. दारिद्रयामुळे वर्षातील कित्येक दिवस आदिवासीना अर्धपोटी आणि उपाशी रहावे लागते. त्यामुळे नाईलाजाने आदिवासीना कायदा मोडावा लागतो. म्हणजे वनखात्याच्या जागेत घुसून शेती करावी लागते.

**भूमिहीनता :-**

भूमीहीनता हा सुध्दा जंगल खात्याच्या जागेत शेती करण्यास आदिवासीना प्रवृत्त करणारा महत्वाचा घटक आहे. थोडी फार जमीन असणा-या आदिवासीपेक्षा भूमिहीन आदिवासीच्या भूकेचा प्रश्न फार गंभीर स्वरुपाचा असतो. त्यामुळे त्यांना वन खात्याच्या जमिनीवर अतिक्रमण करुन शेती करणे भाग पडते.

**तुटपूंजी शेतजमीन :-**

काही भूमीवासी आदिवासी सुध्दा वन खात्याच्या जागेत शेती करतात. कारण त्यांच्याकडील शेतजमीन उपजिविकेच्या दृष्टिने अत्यंत तुटपुंजी आहे. शेतीतील उत्पादन त्यांना एक ते चार महिनेसुध्दा पुरत नाही.

**निकृष्ट, खडकाळ जमिन :-**

बहुसंख्य आदिवासीकडील शेतजमिन निकृष्ट खडकाळ आहे. त्यामुळे उत्पादकता अत्यंत कमी आहे. त्यामुळे वन खात्याच्या जागेत शेती करावी लागते. तसेच एकरी २५ ते ३० टक्के जमीन लागवडी लायक नसल्याने त्यातून काहीही उत्पादन मिळत नाही. जमिनीची उत्पादकता वाढावी म्हणून तीन चार तुकडयापैकी एखादा तुकडा दरवर्षी पाडून ठेवला जातो. त्यामुळे शेतीपासून उत्पादन कमी मिळते म्हणून आदिवासी वन खात्याच्या जागेत अतिक्रमण करण्यास उदयुक्त होतात.

**जमिनीचे आकर्षण :-**

आदिवासीना भूमिपुत्र किंवा जंगलचे राजे असे म्हणतात. अनेक पिढयापासून ते जंगलातच वास्तव्य करुन

असल्याने त्यांना जमिनीची किंवा शेतीची विलक्षण ओढ असते. म्हणून भूमिहिनता दारिद्रय ही जशी अतिक्रमणाची प्रमुख कारणे आहेत. तसेच जमिनीचे आकर्षण किंवा शेतीची ओढ हे सुध्दा अतिक्रमणाचे एक प्रमुख कारण आहे.

**कुटुंबाचा मोठा आकार :-**

आदिवासीची वाढती लोकसंख्या किंवा त्यांच्या कुटुंबाचा मोठा आकार हा सुध्दा घटक आदिवासीना वन खात्याच्या जागेत अतिक्रमण करण्यास प्रवृत्त करतो. आदिवासीच्या कुटुंबाचा आकार मोठा असल्याने कोणाचेच पोट भरत नाही. त्यामुळे वन खात्याच्या जागेत घुसखोरी करण्याचा मोह आदिवासीना आवरत नाही.

**पुरेशा रोजगाराचा अभाव :-**

अभ्यास क्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील शेतजमीन कोरडवाहू असून ती संपूर्णपणे पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. त्यामुळे शेती क्षेत्रात जेमतेम दोन महिनेच रोजगार मिळतो. रोजगार हमी योजनेची कामेही पुरेशी नसतात. त्यामुळे पोट भरण्यासाठी आदिवासीना वन खात्याच्या जागेत शेती करणे भाग पडते.

**अपुरी खावटी :-**

आदिवासीची उपासमार होऊ नये म्हणून शासन दरवर्षी पावसाळयात खावटी कर्ज देते. या कर्जात ९०.०० टक्के भाग धान्याचा व १०.०० टक्के भाग रोख पैसे असा असतो. परंतु ही खावटी कुटुंबाला पुरत नाही. तसेच धान्य निकृष्ट व सडके असते. खावटी कर्जाची परतफेड रोख पैशात करावी लागते. त्यामुळे खावटी कर्ज आदिवासीना परवडत नाही व आवडत नाही. त्यामुळे खावटी कर्ज घेण्यापेक्षा वन खात्याच्या जागेत नागली, वरई, इ. सारखी पीके घेणे आदिवासीना फायदेशीर वाटते.

**उपभोग कर्जावरील व्याजाचे मोठे दर :-**

परिसरातील दुकानदार मोठे, शेतकरी यांच्याकडून आदिवासीना अन्न तुटवडयाच्या काळात कर्ज मिळते. परंतु व्याजाचे दर पंचवीस टक्क्यापासून तीनशे टक्क्यापर्यत असतात. त्यामुळे काही

आदिवासी असे कर्ज न घेता वन खात्याच्या जागेत शेती करतात. तर काही आदिवासी थोडे कर्ज घेऊन वन खात्याच्या जागेत शेती करतात.

**आदिवासीची फसवणूक :-**

काही आदिवासीना आपण वन खात्याच्या जागेत शेती करतो आहोत हेच माहित नसते. आदिवासी समाजातील कोणीतरी फसवून त्यांच्याकडून शेती करवून घेत असतात आणि खंड म्हणून धान्य वसूल करत असतात. अशी सत्य हकीकत एका वन खात्याच्या अधिका-याने मुलाखतीत सांगितली.

**अभ्यासक कार्यकर्त्यांची फूस :-**

आदिवासी समाजाचा अभ्यास करणारे काही अभ्यासक आणि समाजकार्य करणारे काही कार्यकर्ते आदिवासींना वनखात्याच्या जागेत शेती करण्यास फूस लावतात किंवा प्रवृत्त करतात असे सर्वेक्षणात आढळले. "तुम्ही वन खात्याची जमीन ताब्यात घेऊन कसा, आम्ही शहरात आंदोलन करुन ती जमीन तुमच्या नावावर करुन देतो." अशी चिंथावणी शहरातील काही लोक आमच्या भागात येऊन आदिवासीना देतात असे ठिकठिकाणच्या आदिवासीनी विशेषतः युवकांनी सर्वेक्षणा दरम्यान सांगितले .अशा प्रकारे शहरातील बिगर आदिवासीचा अपप्रचार हा सुरक्षा घटक आदिवासीना वन खात्याच्या जागेत अतिक्रमण करण्यास उद्युक्त करतो.

**लाचखोर कर्मचारी :-**

वन खात्याचे काही कर्मचारी लाचखोर आहेत. वन खात्याची जमीन कसणाऱ्या आदिवासीकडून दारु, कोंबडी व तांदूळ घेतात. कर्मचा-यांना लाच दिली की, कर्मचारी वन खात्याच्या जागेत शेती करु देतात असा आदिवासीचा अनुभव आहे. त्यामुळे अन्य आदिवासी सुध्दा वन खात्याच्या जागेत शेती करण्यास उदयुक्त होतात.

**आदिवासीचे अज्ञान :-**

वन खात्याची जमीन कसण्याचे आदिवासीचे अज्ञान सुध्दा कारणीभूत आहे. बहुसंख्य आदिवासी अशिक्षित असून

विविध सरकारी कायदयाच्या बाबतीत ते अज्ञानी आहेत. सरकारच्या वनखात्याच्या जमिनीत शेती करणे हे अतिक्रमण आहे. गुन्हा आहे असे आदिवासीना वाटत नाही. अशा प्रकरे अज्ञानापोटी सुध्दा आदिवासीकडून वनखात्याच्या जमिनी कसल्या जातात.

**वन कर्मचाऱ्याना वाटणारी भीती :-**

आदिवासी भागात फिरताना असे आढळले की, काही ठिकाणी वनखात्याचे कर्मचारीच आदिवासीकडून होणाऱ्या अतिक्रमणाकडे दुर्लक्ष करतात. अतिक्रमणाला विरोध करत नाहीत किंवा आदिवासीवर कारवाई करत नाहीत. काही ठिकाणी तर फॉरेस्ट खातेच्या कर्मचाऱ्यांनी जंगलात गस्त घालणेही बंद केल्याचे आदिवासीनी सांगितले. याचे कारण आदिवासीना विचारता त्यांनी सांगितले की, पेपरवाले अतिक्रमण करणा-या आदिवासीचीच बाजू घेतात. त्यामुळे कर्मचारी दुर्लक्ष करतात. तसेच सर्वेक्षण करताना असेही आढळले की, एकटया-दुकटया कर्मचाऱ्याला आदिवासी घेरतात, पळवून लावतात किंवा मारतात सुध्दा अशा प्रकारे काही ठिकाणी आदिवासी आक्रमक झाले आहेत. त्यांची वन कर्मचाऱ्यांना भीती वाटते ते जंगलात जात नाहीत. त्यामुळे तेथील आदिवासी बिनधास्तपणे वन खात्याच्या जागेत घुसून शेती करतात.

**जमिन नावावर करण्याची आशा :-**

वन खात्याच्या जागेत अतिक्रमण करुन शेती करण्याचे आणखी एक कारण आदिवासीशी झालेल्या चर्चेतून आढळले . आदिवासीनी सांगितले की, वन खात्याच्या जागेत शेती करणाऱ्या काही आदिवासीना सरकारने हया जमीनी नावावर करुन देणार आहे. अशा प्रकारे काही आदिवासीना वन खात्याची जमिन मिळाली असल्यामुळे आपणालाही ती मिळेल या आशेपोटी आदिवासी वन खात्याची जमीन कसत राहतात. दरवर्षी नियमितपणे वन खात्याची जमीन कसली आणि वर्षानुवर्ष ती आपल्या ताब्यात ठेवली तर एक दिवस सरकारला

ती आपणास दयावीच लागेल असे आदिवासीना वाटते. त्यामुळे काही आदिवासीना अतिक्रमण करण्याचा मोह होतो. अन्य आदिवासी वन खात्याची जमीन कसतात म्हणून इतर आदिवासी सुध्दा वन जमिनी कसण्यास प्रवृत्त होतात.

**सरकारबद्दल आस्था नसणे :-**

बहुसंख्य आदिवासींचा सरकारकडे पाहण्याचा दृष्टिकोन फारसा चांगला नाही. आदिवासीना सरकारबद्दल फारशी आस्था नाही. तसेच विश्वासही नाही. विविध खात्यातील सरकारी कर्मचारी व अधिकारी यांचा भ्रष्टाचार ते उघडया डोळयांनी पाहत असल्याने वन खात्याच्या जमिनीत शेती करुन आपण काही गुन्हा करीत आहोत असे त्यांना बिलकूल वाटत नाही. त्यामुळे ते वनखात्यांच्या जागेत शेती करतात.

**शेती कसण्याचा कमी खर्च :-**

वन खात्याच्या जागेत शेती करण्याचे आणखी एक कारण म्हणजे अशा जमिनीत शेती कसण्याचा फारसा खर्च आदिवासीना येत नाही. आदिवासी अशा जमिनीत शेती करण्यास फारसा खर्च करत नाही. आदिवासी अशा जमिनीत प्रामुख्याने नागली , वरई इ. पिके घेतात. नागलीची रोपे डोंगर उतारावर नुसती फेकली तरी ती पावसाने तरारुन उगवून येतात. कर्मचाऱ्यांची नजर चुकवून अशी कामे सहज करता येतात.

**जंगलतोड :-**

जंगलतोड हे सुध्दा अतिक्रमणास जबाबदार असणारे महत्वाचे कारण आहे. जंगले आता पुर्वी इतकी घनदाट राहिलेली नाहीत. जंगलात ठिकठिकाणी मोकळी जागा असते. त्यामुळे या जागेत शेती करण्याचा मोह आदिवासीना आवरत नाही. मोकळया जागेत शेती केल्यावर सरकारचे काहीच नुकसान होणार नाही असे आदिवासीना वाटते. त्यामुळे मोकळी जागा पाहून ते त्या जागेत शेती करण्यास उत्सुक्त होतात.

**आदिवासी समाजातील पुढा-याची फूस :-**

आदिवासीच्या अतिक्रमणास अन्यही काही घटक जबाबदार आहेत.

आदिवासी समाजातील काही पुढारी लोक आदिवासीना वन खात्याच्या जागेत शेती करण्यास व झोपडया बांधून राहण्यास प्रोत्साहन देतात. अशा प्रकारे पुढाऱ्यांच्या चिथावणीने व त्याच्यावर विश्वास ठेऊन काही आदिवासी वन खात्याच्या जमिनीवर अतिक्रमण करुन शेती करतात.

* * *

# महाराष्ट्रातील प्रतिरोधात्मक (counter) चळवळ: देवी चळवळ

* सहारे पद्माकर एन.

**प्रस्तावना :-**

आदिवासी शब्दाचा अर्थ त्या त्या ठिकाणचे आद्य किंवा मूळचे रहिवासी (Indigenous peoples) असा असून तो शब्द वापरतांना एक मुख्य गोष्ट अशी लक्षात येते की, त्यात प्रभावीपणे उत्क्रांतीवादी सूचितार्थ समाविष्ट आहे. आदिवासीसाठी भारतात ट्रायबल्स् (Tribals) हा शब्द वापरला जातो. हा समूहवाचक आणि विशिष्ट जीवनशैली दर्शविणारा आहे. आदिवासी शब्द ट्रायबल या अर्थाने ग्रामीण आणि शहरी समूदायापेक्षा भिन्न जीवनशैली दर्शविणारा आहे आणि त्या अर्थाने वापरला पाहिजे. आदिवासी हे मानवी उत्क्रांतीमध्ये मागे (archaic) राहून गेलेले असा अर्थ घेण्यात येतो. आदिम, आदिवासी आणि आधुनिक माणूस यात स्पष्ट विरोधाभास राहिला आहे. १९ व्या शतकाच्या अगोदर आणि २० व्या शतकाच्या प्रारंभी रंगभेदाच्या (निम्न वंश) आधारे त्याचा अवलंब केला गेला. आदिवासींना भारतात निम्न जातीप्रमाणेच बघितले गेले आणि त्यांच्यापेक्षा विकासात पुढे असलेल्या जातींनी (Superior races) अस्तित्वाच्या संघर्षात त्यांना कनिष्ठ (Inferior races) बनविले. येथे सामाजिक डार्विनवादी उत्क्रांती सिद्धांतानुसार आदिवासी पराजित झाले. बाह्य लोकांबरोबरच्या संपर्कातून, अस्तित्वाच्या संघर्षातून आदिवासींची प्रतिकार करण्याची जाणीव जागृत झाली.

* समाजशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. जि. औरंगाबाद. पिन कोड-४३१००४.

सामाजिक परिस्थितीशी समायोजन (Adaptation) करतांना स्वातंत्र्य प्राप्तीपूर्वी महाराष्ट्राबाहेर आणि महाराष्ट्रातही

ह्या चळवळी बंडाच्या (rebels) स्वरूपाच्या होत्या व ही बंडे प्रामुख्याने सावकारांचे जुलूम व जमिनींचे हस्तांतरण ह्या विरूद्धची होती. सावकारांचा अन्याय आदिवासी सहन करीत आणि अशा अन्यायाची परिसीमा संपली की, त्याविरूद्ध एखाद्या आदिवासी नेत्याच्या प्रोत्साहनाने बंड त्या काळात महाराष्ट्रात होत. उदा. १९ व्या शतकामधील सह्याद्रीतील अहमदनगर, पुणे आणि नाशिक जिल्ह्यातील महादेव कोळ्यांचे बंड सर्वांना परिचित आहे.

ब्रिटिश सरकारकडून वसाहतवादी धोरणाच्या यशस्वीतेसाठी जमीनदार, संरजामदार, सावकार व व्यापारी यांना कायद्याच्या माध्यमातून जे विशेष संरक्षण मिळाले त्याचा परिणाम म्हणून शेतकरी, शेतमजूर, आदिवासींवर अनिष्टता आली. जमीनीची मालकी, शेतसारा, जमीनविषयक संबंध, उत्पादनाचा हिस्सा, व्यापारी वर्गाला मिळणारी दलाली, जंगल विषयक कायदे या झालेल्या आदिवासींच्या सामाजिक चळवळीत एक समान सूत्र होते.

सर्व ब्रिटिश कायद्यामुळे प्रत्यक्षात उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांपेक्षा जमिनीची मालकी संपादन केलेल्या जमीनदारालाच सर्वाधिक फायदा मिळू शकला. त्यामुळे शेतकरी, शेतमजूर, आदिवासी यांना शोषणात्मक व कर्जबाजारी जीवन जगावे लागले. सावकारांच्या दामदुप्पट व्याजामुळे आनुवंशिक स्वरुपाचे कर्जबाजारी जीवन जगावे लागले. त्यातून जमीनदार, सावकार, व्यापारी व ब्रिटिश सरकार यांच्या विरूद्ध तसेच ब्रिटिश पोलिस यंत्रणेविरूद्ध उघड संघर्ष करण्याऐवजी प्रतिरोधात्मक चळवळी (Counter Movements), सुधारणावादी चळवळी करण्याचा शेतकरी, शेतमजूर व आदिवासी यांनी प्रयत्न केला. स्वातंत्र्यपूर्व कालावधीत देशाच्या विविध क्षेत्रातील शेतकऱ्यांनी, निम्न जाती लोकांनी आणि आदिवासी जमातींनी आंदोलनात्मक स्वरूपाचे बंड केली आहेत. प्रादेशिक पातळीवर त्या त्या प्रसंगानुरूप आणि

प्रश्नानुरूप सामाजिक चळवळी झाल्या असल्याचे दिसते. या चळवळीत राजकिय शक्तीपेक्षा लोकसमुहशक्ती ही सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत महत्त्वाची शक्ती ठरली.

समूहातील वर्चस्व वा अधिपत्य (Hegemony) विषयी ग्रामशी नावाचे विचारवंत असे स्पष्ट करतात की, राजकीय शक्ती व विचारप्रणालीच्या साहाय्याने एक वर्ग दुसऱ्या वर्गावर आपले प्रभूत्व स्थापित करतो. प्रभूत्व स्थापन करण्यात राजकीय शक्ती नेहमीच महत्वपुर्ण भूमिका बजावते; परंतु शोषीतअंकीतवर्गाची (Subaltern) सहमती प्राप्त करण्यासाठी विचारप्रणालीची भूमिकाही (role of ideology) तितकीच महत्त्वपूर्ण आहे. राजकीय शक्तीची साधने आणि अंकित लोकांची सहमती यांच्यांत संतूलन विभिन्न समाजात भिन्न असते.

ग्रामशी यांच्यामते राज्य हे राजकीय शक्तीचे मुख्य हत्यार आहे. त्याला विचारप्रणालीच्या आधारे सहमती मिळते. ग्रामशी यांनी कार्लमार्क्स यांच्या द्वंद्वात्मक भौतिकवादाची चिकित्सा केली आहे. त्यांच्यामते राजकीय शक्ती व विचारप्रणाली यांना ऐतिहासिक भौतिकवादापासून वेगळे वा स्वतंत्र केले पाहिजे. कारण भांडवली वर्गाच्या वर्चस्वाला (Hegemony) आर्थिक कारणाने संपविता येणार नाही त्यासाठी राजकीय शक्तीची आवश्यकता लागते आणि त्यापेक्षाही विचारात्मक तंत्राची आवश्यकता असते. वर्चस्वाचा सांस्कृतिक नेतृत्वाचा संबंध आहे जो शासक वर्गाशी आहे.

ग्रामशी यांचे मते आधुनिक बुझ्र्वा (Bourgeois) समाजाचा मुख्य स्त्रोत शासक वर्गीय सांस्कृतिक नेतृत्वाशी आहे आणि हे जनसमुदायावर आपल्या मूल्यांची छाप पाडून अंकीत करतात असे नेतृत्व कुटुंब, धार्मिक संस्था, शाळा इ. माध्यमातून कार्य करतात. म्हणून जो पर्यन्त मूल्ये व प्रमाणकांच्या क्षेत्रात बुझ्र्वा (Bourgeois) तत्वांचे अधिपत्य संपत नाही तोपर्यन्त शोषितअंकितवर्गांची चळवळ यशस्वी होणार नाही. लुईस् अल्थ्युझर यांनीही

मार्क्सच्या आर्थिक निर्धारकवादालाच (Economic determinasm) महत्त्व दिले नसून त्याबरोबरच राजकीय आणि वैचारिक घटकाला सुध्दा (role of ideology) महत्त्व दिले आहे.

**आदिवासींनी केलेली धार्मिक चळवळ**

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यानंतर आणि विसाव्या शतकाच्या सुरूवातीच्या काळात भारतामध्ये अन्य आदिवासी भागात झालेल्या चळवळी समरूपच दक्षिण गुजरातमधील देवी चळवळीची लक्षणे आहेत. १९१४-१५ मध्ये छोटा नागपूर प्रदेशातील ऑरान (Oraons) जमातीमध्ये दैवी आदेश सांगणारी चळवळ झाली होती, त्यातही भूतप्रेत-बुवा इ. प्रवृत्ती आणि पशू बलिदानाचा त्याग, मासांहार आणि मद्यपान त्याग करा, बिगर-आदिवासी जमीन मालकाच्या शेतजमीनी कसणे बंद करा तसेच त्यांच्या शेतात शेतमजूरी करू नका असा ताना भगत चळवळीने (१९१४) संदेश दिला. ही चळवळ एकेका गावातून प्रसारीत होत पुढे संपूर्ण बिहारच्या छोटा नागपूर मध्ये पसरली. ह्या चळवळीने राष्ट्रीय वळण घेतले आणि ही चळवळ ब्रिटिश शत्रू जर्मन बाबाच्या (German Baba) नावाने जोडली गेली. अशीच दूसरी १९२१ मध्ये छोटा नागपूर प्रदेशात भूमिज जमातीत झाली. या वर्षी अशी अफवा पसरविली गेली की, पृथ्वीवर नव्या राजाचा जन्म झालेला आहे आणि तो स्वयं परमेश्वराचा अवतार आहे. त्यांनी भूमिज जमातींना दारू, मासे आणि मांस त्याग करावयास सांगितले आहे. ही चळवळ सुद्धा शीघ्र गतीने पसरली. दूसऱ्या वर्षी शेतीतील धान्याचे विक्रमी उत्पादन झाले तेव्हा लोकांचा अधिकच विश्वास वाढला. तीन-चार वर्षानी त्या राजाचे नाव प्रकट झाले, ते होते महात्मा गांधी. अशा प्रकारच्या अनेक चळवळीविषयी स्टीफन फयूचेस (Stephen Fuchs) यांनी Rebellious Prophets आणि के. एस. सिंग यांच्या Tribal Movements in India मध्ये नोंदलेल्या आहे. राष्ट्रवादी इतिहासाचा उल्लेख करतांना रणजित गुहा म्हणतात, एक इतिहासकार वा अभिजन

अशा चळवळीचे आदर्शरूप मांडण्याचा प्रयत्न करतो की, ज्यात पराजित (Subjugation) वर्गांना स्वातंत्र्य वा स्वराज्यासाठी साहस/प्रेरणा (Venture) मिळेल. उपलब्ध साहित्याच्या लिखाणामधून मध्य भारतीय विस्तारातील मुख्य आदिवासी जमातीमध्ये पुर्वेकडील बंगालपासून पश्चिमेकडील गुजरातपर्यंत स्वत:चा जीवनमार्ग बदलण्यासाठी आदिवासी हे शतकांपासून सामूहिक प्रयत्न करतांना दिसतात.

स्वातंत्र्यपुर्व काळात महाराष्ट्रातील आदिवासीमध्ये दोन मोठ्या धार्मिक चळवळी झाल्या. त्यापैकी देवीची चळवळ ही महाराष्ट्रापेक्षा गुजरातमध्ये अधिक प्रभावी ठरली. अशाच प्रकारची एक दूसरी धार्मिक चळवळ सन १९३० मध्ये धुळे जिल्ह्यातील आदिवासी भागात **गुल्या महाराज** नावाने सुरू झाली. वारकरी संप्रदाय आणि पुढे हिंदू गुजराथी संतांशी परिचय झालेल्या ह्या अशिक्षित शेतमजूराने रोज *आरती करणे सुरू करून लोकांना दारू व मांस वर्ज्य करावयास सांगितले.

आदिवासी परंपरागत पद्धतीने स्वतः दारू बनवित होते. दारू पिणे आदिवासीसाठी अनेक दृष्टीने अगत्याचे मानले (सांस्कृतिक मूल्य) गेले होते. बाह्मण, जैन व ख्रिश्चनांपेक्षा या ठिकाणी वेगळी मान्यता आहे, ती दारू पिणाऱ्याला अधिक आदर करणारी होती. आदिवासीं मते देवी-देवताही दारू ताडी पितात व त्यांना देखील दारू-ताडी अर्पण करून प्रसन्न करता येऊ शकते. दारू पिण्यापूर्वी ते देवतांसाठी दोन थेंब जमीनीवर अर्पण करतात. पूजा करतेवेळी नैवेद्य बरोबर दारू अर्पण केली जाते. स्थानिक दंतकथानुसार ब्राह्मण पुरोहीताने ईश्वराला तूप (यज्ञामधून) दिले व भिल्लाने (आदिवासींनी) दारू दिली की तो प्रसन्न होतो, म्हणून जीवनकर्मातील प्रत्येक विधीत दारू-ताडी अगत्याचे मानले जाते. जन्मविधी, विवाह वाङ:निश्चय, विवाहापूर्वीच्या दिवशी स्त्री-पुरूष दारू पिऊन एकत्रित नृत्ये करतात. मृतविधीनंतर

दारू, होळीच्या सणांत दारू इ. वेळी दारू पिणे आवश्यक मानले गेले. फ्रेंच, जर्मन व्यक्ती आणि पश्चिमेकडील दारू पिणाऱ्या अन्य व्यक्तींच्या मते दारूला महत्त्व आहे. जर्मनीत बीयरला महत्त्व आहे. येथे शेती करणारा भिल्ल आदिवासी दारू-ताडीला महत्त्व देतो. ते शेतात, मोकळ्या जागेत, झाडाखाली, मांडवाखाली कोठेही दारू पितात.

ज्यांच्या जमीनीत ताडीचे झाड (माड) आहे ते त्यांचे मालकीचे असा सामान्य नियम होतो. १९ व्या शतकाच्या मद्यपानविषयक कायद्यापुर्वी ताडीवापरा विषयी कोणताही परवाना नव्हता वा कोणाला विचारण्याची आवश्यकता नव्हती. प्रत्येकजण आपापल्या पद्धतीने स्वतः आणि पाहुण्यांच्या आदरतिथ्यसाठी ताडीचा वापर मुक्तपणे करीत होते. अतिरिक्त ताडी विकण्यासाठी मात्र परवाना घ्यावे लागे, ते मोठ्या प्रमाणात पारशांकडे (पारशी धर्मीय लोक) होते. १८३० ते १८६७ दरम्यान सुरत जिल्ह्यात सुलतानांकडून परवाना असलेली ताडीची दुकाने १२४ ते १८३ होती, त्यातील अर्धअधिक दूकाने सुरत शहरात होती. १८७८ मध्ये दारू कायदा आला आणि या विभागात ताडी पिण्याचे प्रमाण कमी झाले. दारू मुख्यत्वे महूच्या फुलांपासून (महू झाडाची फूले) बनवित. कायदेशीर परवाना असलेली व्यक्तीच दारू बनवू व विकू शकत होती. या पद्धतीप्रमाणे विशाल विस्तारामध्ये दारू विकण्याचा अधिकार एका वर्षासाठी लिलाव पद्धतीने मिळत होता. यात मोठी बोली बोलणारे **पारशी** असायचे आणि ते नंतर आदिवासीकडून वसूल करुन घ्यायचे. स्थानिक दारू गाळणाऱ्यांकडून स्वस्तात दारू गाळून विकत असत. पारशी स्वतः मात्र दारू बनवित नसत. १९३०-३१ मध्ये सुरत जिल्ह्यात २८२ दारूच्या भट्टया आणि २८५ दारू दुकाने होती. जवळ जवळ सर्व दुकानांचा संचालक एक पारशी व्यक्ती होता. गावात दारू व्यापार करणारा मुख्यत्वे पारशी होते. दक्षिण गुजरातमध्ये पारशी मुलभूतरीत्या शेती करणारा शेतकरीही होता. प्रत्येक गावात दारूची पिढयान्पिढया दुकाने

चालविणारे पारशीच होते. १९ व्या शतकाच्या मध्यकाळात ब्रिटिश अधिकाऱ्यांनी समग्र आदिवासी विस्तारामधील पारशांविषयी लिहिलेले आहे. खानदेशचे कलेक्टर व डांगचे राजकीय प्रतिनिधी एम. एम. मॅझफिल्ड यांनी १८५४ मध्ये एका अहवालात लिहिले की, डांगच्या पश्चिम सरहद्दीवर पारशांच्या मालकीच्या दारू भट्ट्या होत्या. पारशी दरवर्षी महूची फुले एकत्र करण्यासाठी डांगमध्ये येत. या विस्तारात तर पारशांकडून भिल्ल मुखियांनी पैसे देऊन दारूचे अधिकार घेतले होते.

दारू स्वस्त असूनही पारशांकडे आदिवासींची उधारी होती. आदिवासी पारशींना जमीन गहाण अथवा विकून त्या बदल्यात दागिने, धान्य व दारू घेत. दारूच्या रक्कमेपोटी गावातील प्रत्येकाची पारशांकडे उधारी होती. अशाही स्थितीत १८७६-७७ मध्ये पारशांनी जेव्हा दारूच्या एका बाटलीला ८ पैसे ऐवजी ९ पैसे भाव केला तेव्हा भिल्लांनी पंचायत बोलावून ठरविले की, जो पर्यंत जूना भाव ८ पैसे प्रमाणे दारू मिळत नाही तोपर्यंत दुकानातून दारू घ्यायची नाही आणि ज्याने नियम मोडला त्याला जमातीतून बहिष्कृत केले जाईल. या निणर्याने तीन महिने दुकान बंद होते नंतर दुकानदार पारशीला माघार घ्यावी लागली. पंचाना एक हंडा दारू भेट देऊन व जूना भाव कायम ठेवून दूकान पूर्ववत चालू केले. या ठिकाणी आदिवासींच्या संघटनशक्ती व एकतेची अनुभूती येते.

१८६० च्या जमीनमहसूल कायद्यानंतर जमीन बाजार योग्य वस्तू बनल्यामुळे पारशांनी दारू विकण्याच्या बदल्यात आदिवासींच्या जमीनी घेतल्या. १८७० नंतर पारशांना आदिवासी गावात जाण्याचे प्रोत्साहन मिळाले तशी स्थितीच निर्माण झाली. १८७७ मध्ये सुरत जिल्हयाच्या गॅझिटिअरमध्ये नोंद आहे की, सुरत व बडोदा प्रदेशात स्वतःच्या कुटुंब सदस्यांना शहरात ठेवून आदिवासींच्या वस्तीत कोणी दारूचे कॉन्ट्रेक्टर पारशी एखादी जागा शोधून दोन माळा असलेले विटांचे पक्के घर बांधतो. गावापासून दूर दोन

तीन एकर जमीन, जनावरे, स्वतःच्या दारूच्या व्यापारातून, बचतीच्या पैसातून जमीन खरेदी करणे अशी कित्येक उदाहरणे आहेत. कित्येक उदाहरणात पारशांनी आदिवासीची सर्व संपत्ती हस्तगत केली. काळी परज (काळी प्रजा) आदिवासी बरोबरच्या व्यापारातून पुरेपूर लाभ घेतला. जो शेतकरी भूमिहिन होऊन जाई त्याला स्वतःच्या घरी सालकरी म्हणून कामाला ठेवायचे. पारशी स्वतः काही जमीन कसत नव्हते तर ते आदिवासीकडून शेती करुन घेत. १८८८ मध्ये नवसारी (बडोदा राज्य) आणि वासंदा, धरमपूर, डांग, सुरगाणा आणि राजपिंपळा संस्थानात केंद्रस्थ दारू गाळण्याच्या भट्टया मुंबईचे श्रीमंत पारशी दादाभाई दुभाष चालवित होते. या अधिकारासाठी वर्षाकाठी ४, ७५, ००० रु.कर ब्रिटिशांना भरत होते. त्यांच्याकडे हितरक्षणासाठी स्वतःचे खासगी पोलीस दल होते. गैरकायदा दारू गाळणाऱ्या आदिवासींचा तपास करण्याचे काम पोलिसांकडे होते. पारशीच गावात दारू विकत. ताडीच्या झाडावर पहिल्यांदा १८७९ मध्ये जकात कर लावला. पारडी तालुक्यात झाडामागे १२ आणे, चिखली तालुक्यात ८ आणे, १८८१ मध्ये १ रुपये अशा नव्या कायद्याप्रमाणे ज्यांचेकडे सरकारी परवाना असेल तेच ताडीच्या झाडाचे छेदन करु शकत होते. यात काहीच आदिवासी लिलावाची बोली बोलू शकत होते. आदिवासी लोकांच्या जमीनीतील ताडीच्या झाडावर जकात कर लादला, त्यामुळे सुरत जिल्ह्यात विरोध झाला. शेतकऱ्यांनी मुंबई सरकारला केलेल्या लेखी अर्जात लिहिले की, ताडी आमचे मुख्य सकस पेय आहे. आम्ही थकलो तर आम्हाला यातून स्वास्थ मिळते. हा आमचा मुख्य आधार आहे. विवाह व मृत्युप्रसंगी आमची महत्त्वाची वस्तू आहे. ताडीवरील करामुळे ती खूपच महाग झाली, आता ताडी मिळणे कठीण झाले.

आदिवासींच्या आजूबाजूला असणाऱ्या पारशी व्यापाऱ्यांमध्ये आणि शहरातील सावकार यांच्या शोषणांमध्ये गुणात्मक तफावत होती, त्याचे मुख्य कारण

पारशी संपुर्ण विस्तारात पसरलेले होते. सामान्यरित्या पारशी त्यांची संपुर्ण जमीन मजूरांच्या साहाय्याने कसत होते आणि कमी उपजाऊ व दूरची जमीन भागीदारीने आदिवासींना कसायला देत होते. १९०६ मध्ये सी.एन.सॅडो यांनी व्यारा तालुक्यात २३२ पारसी हे जमीन मालकी असणारे होते असे लिहिले. शेती कामासाठी आदिवासींना जेव्हा शेतात काम असे तेव्हाच पारशांनाही शेतमजूर लागत. अशावेळी स्वतःचे काम सोडून पारशांकडे शेती कामास जावे लागे. जो कामास जात नसे त्याला शिव्या देणे, प्रसंगी मारहाण होत असे. पारशी घोडयावर बसून गावात येत ज्या मंजूरांची आवश्यकता आहे त्यांच्या घरी थोडे पैसे देऊन निघून जात, दुसऱ्या दिवशी पारशांकडे शेतकामास जावे लागे.

दारूचे व्यापारी हे खास करुन आदिवासी स्त्रियांना फसवून ते शारीरिक आंनद घेत. अशा प्रकारच्या बलात्कारातून कित्येक अपत्य जन्माला आली. उदा.वासंदा राज्यात १९०१ मधील जनजणना अहवालात ५६ पारशी पुरुष, ४८ पारशी स्त्रिया आणि ९ हाफ कास्ट (Half caste) चा समावेश आहे, हे सर्व पारशी पुरुष व आदिवासी स्त्रियांची अपत्ये होती. बी. एस. मेहता लिहितात, एका पारशीपासून एका चौधरी जमातीच्या स्त्रीस ८ मुले होती. प्रवासाला आलेल्या सरकारी अधिकाऱ्यांनासुध्दा पारशी लोक आदिवासी मुलींना सेवेस पाठवित असत. धोडिया जमातीचे लोक पारशींबरोबर आलेल्या संबंधामुळे मुलींचे शद्धीकरण विधी करीत. अशा मुलींचा जमातीचे लोक तिरस्कार करीत. त्यांना सामाजिक बहिष्कृत करीत.

शहरातील सावकार भांडवली कायद्याप्रमाणे आदिवासींचे शोषण करीत तर पारशी आदिवासींचे साधेसरळ आणि जंगली पद्धतीने शोषण करीत. सावकार व दारूच्या व्यापाऱ्यांच्या भीषण शोषणापुढे दक्षिण गुजरातमधील आदिवासी सुरुवातीला खूपच लाचार झाले. भूतकाळापासून शोषणास प्रतिकार करण्यापेक्षा स्थंलातर करण्याचाच प्रयत्न झाला असल्याचे दिसते. भारताच्या

अन्य भागातील आदिवासींनी निष्फळ बंड करण्याचा प्रयत्न कधीही केला नाही. सामाजिक उत्क्रांतीच्या डार्विनवादी दृष्टीबिंदू प्रमाणे आणि उत्क्रांतीच्या नियमाप्रमाणे आदिवासी जमातींना अस्तिवाच्या लढाईत नेहमी सबळ वर्गानांच रस्ता करून द्यावा लागला आहे. जमीन नांगरुन शेती करणे व शांततेत जीवन जगण्याचे पसंत केले. ज्यावेळी जमीनीची मुबलकता होती तेव्हा दरवर्षी **स्लेश व बर्न** (Slash & Burn) पद्धतीने शेती कसत होते. सत्ताधाऱ्यांशी संबंध हे संघर्षाचे नसून अलगत्वाचे होते. अधिकाऱ्यांना भेटण्यापेक्षा ते जंगलात पळून जात असत. सावकारी कर्ज वा कर भरण्यास असमर्थ वा असह्य होई तेव्हा तेव्हा दुसऱ्या विस्तारात स्थंलातर करीत; परंतु १९ व्या शतकाच्या दुसऱ्या टप्प्यात मोकळी जमीन कमी झाली, कायद्याचे निर्बंध आले आणि विविध कायद्यांमुळे स्थंलातराचा तसेच पलायनचा प्रयास अव्यवहार्य झाला. आता मात्र आदिवासींना राहत्या ठिकाणीच परिणाम, शोषण सहन करण्याशिवाय वा प्रतिकार करण्याशिवाय दुसरा पर्यायच नव्हता.

### देवीचे मूळ व परिवर्तन

मुंबई प्रांतातील सुरत जिल्ह्याच्या पुर्वेला वसलेल्या खानापूर (ता.वालोड जि.सुरत) गावात ९ नोव्हेंबर १९२२ रोजी दोन हजार आदिवासी गावाच्या मैदानात एकत्र आले. सहा गावातून आलेले हे लोक सौ. सलाबाई नावाच्या एक नवीन शक्तीशाली देवीचा उपदेश ऐकण्यासाठी एकत्रित आले होते. ही देवी पुर्वेकडच्या डोंगरामधून आली असल्याचे मानले गेले आणि देवीने काही लोकांना मध्यस्थीरूपात कित्येक तत्वांच्या मागण्या वा पालन करावयाचे नियम घेऊन पाठविले आहे असे मानले गेले. हे मध्यस्थी लोक (दूत) एका मांडवाखाली एकत्रित लोकांसमोर बसले. त्यांच्या हातात लाल कपडा होता व त्यांनी कपड्यातून देवीचा आदेश जाहीर केला. **दारु-ताडी पिणे बंद करा. मांस-मासे खाणे बंद करा. स्वच्छ आणि साधे जीवन जगा. पुरुषांनी दिवसातून दोन वेळा स्नान**

**करावे. स्त्रियांनी दिवसातून तीन वेळा स्नान करावे. पारशांबरोबर संबंध ठेऊ नका.** हा आदेश वाचून पुर्ण झाल्यानंतर ज्यांनी देवीचा वेशधारण केला आहे अशा लहान मुलींनी आदिवासींच्या पाया पडून त्यांच्या चरणी पैसे दिले. त्यांनतर सर्वांनी सामूहिक भोजन केले. (याविषयी अधिक माहिती मिळविण्यासाठी डेव्हिड हार्डीमन यांनी खानदेश (धुळे, नंदूरबार) व नाशिक विस्तारात आदिवासी लोकांच्या मुलाखती घेऊन प्रत्यक्ष मुलाखती (अध्ययन १९८१ ते १९८५ दरम्यान) आधारे असे लिहिले की, पालघर (ठाणे) विस्तारात ही देवी चळवळ शीतळाचा रोग (प्लेग, कॉलरा, इन्फ्लुएंझा) शांत करण्यातून झाली. हा रोग देवीच्या कोपाने होतो तेव्हा ही देवीची विनवणी होती. कित्येक स्त्रियांच्या अंगात देवी येते तेव्हा त्या स्त्रिया स्वतःच्या इच्छा प्रकट करतात. या माध्यमरूपी स्त्रियांना **सलाबाई** म्हणत. सला म्हणजे सल्ला. म्हणजेच सल्ला देणारी स्त्री). वरील घटनेची माहिती सुरतच्या नायब कलेक्टरांना दोन दिवसांनी झाली. मुबई सरकारच्या रेकॉर्डमध्ये देवीच्या प्रेरणेने झालेल्या आदिवासी संमेलनाच्या प्रत्यक्षदर्शी अहवालाची नोंद आहे. पुढे प्रत्येक ठिकाणी देवीचा आदेश ऐकण्यासाठी मोठया संख्येने आदिवासी एकत्रित येत होते. त्यात अशी मान्यता प्रसारीत झाली की, जो देवीचा आदेश मानणार नाही त्यावर संकटे ओढावतील, तो वेडा होईल व प्रसंगी मृत्यू होईल. सुरतच्या कलेक्टर मॅकमिलन १९२२-२३ च्या वार्षिक अहवालात लिहितात की, देवीच्या परिणामाने आदिवासी विस्तारात देवीचा प्रभाव पडला आणि जेथे चौधरी जमातीचे लोक बहुसंख्याने गावात रहातात तिथे अधिक प्रभाव जाणवला. या प्रदेशात दारू-ताडी पिणे मोठया प्रमाणात बंद झाले. लोकांच्या मागणीमुळे मॅकमिलन यांनी या विस्तारातील १५ दारूची दुकाने बंद केली. जमीन महसूल भरण्यासाठीचा हप्ता आता लोकांना सावकारांकडे पैसे मागण्यासाठी जाण्याची आवश्यकता नाही. पुर्वी त्यांना कोणत्याही हंगामात पैसे घ्यावे लागत होते. त्यांनी धार्मिक विधीचा खर्चही कमी केला

आहे. आता पैसे घेण्याचे अवलंबन दूर झाले त्यांचे सामान्य जगणे घरातील आणि गावातील राहणे बदलले असून त्यांनी स्वयंपाकाची पितळी भांडे वापरात आणली तसेच पत्नीसाठी चांगले कपडे खरेदी करु शकतात.

मानवशास्त्रज्ञांनी या विषयी लिहिले की, सामान्यपणे इतिहासकार राष्ट्रीय वा समाजवादी चळवळींना लोक चळवळ मानतात. राष्ट्रीय इतिहासाचा उल्लेख करतांना रणजीत गुहा म्हणतात ह्या चळवळीला इतिहासकार आदर्शरूप मानतात की, भारतीय निम्नवर्गांनी स्वराज्यसाठी योगदान दिले. दक्षिण गुजरातमध्ये आदिवासीमध्ये चाललेल्या गांधी चळवळीच्या इतिहासात जुगतराम दवे म्हणतात, देवी चळवळ निर्माण झाली त्यावर्षी गांधीजी व त्यांच्या अनुयांयांच्या प्रेरणेतून ही चळवळ झाली. ही चळवळ निम्न वर्गाच्या अभ्यासाचा एक भाग आहे. या अभ्यासाचा उद्देश हा समजण्यात येतो की, निम्न वर्गानी स्वतःच्या जाणीवेतून राजकीय जीवनाची प्रेरणा घेतली. यासाठी त्यांना बाहेरच्या उच्चवर्गाच्या योगदानाची आवश्यकता नाही. या जाणिवेला धर्माची जोड दिली आहे. पार्थ चटर्जी म्हणतात, ग्रामीण सामूहिक कार्यांना आकार व स्वरुप देण्यात मुलभूतरीत्या धार्मिकता होती. ग्रामीण मानव व निसर्ग यातील संबंध धार्मिक होता. या प्रकारच्या जातीसमुहासाठी धर्म व अस्तित्वासाठी धार्मिकमिमांसा आहे. देवी कुठून आली या विषयी समकालीन वर्णने अस्पष्ट आहेत. ह्या चळवळीविषयी १९२२ मध्ये अधिकाऱ्यांच्या लक्षात आले तेव्हापासून याविषयीच्या काही नोंदी सापडतात.

सर्वसामान्यपणे बघता देवीचा संदेश कोकणा, वारली, धोडीया, महादेव कोळी, भिल्ल, चौधरी, गावीत या जमातींनी दारू-ताडी आणि मासं-मासे खाण्याचे त्याग करावे तसेच त्यांनी रोज स्नान करावे त्याचबरोबर पारशी, वाणी व मारवाडी यांच्या शोषणापासून परावृत्त होण्याचा आदेश म्हणून स्विकारला.

सलाबाई (देवी), शीतळाची देवी पद्धतीने उद्‌भव होऊन पारडी (गुजरात) विस्तारमध्ये आदिवासीसाठी **समाज सुधारणेसाठी एक प्रबळ शक्ती बनली**. डांगमधील (आता गुजरातराज्यामध्ये) **कोकणा** जमातीसाठी भूत, राक्षस व चेटकिण सारख्या मान्यतेविरुध्द या चळवळीने कार्य केले तर **चौधरी** जमातीसाठी शोषण करणाऱ्या पारशींना एक प्रतिरोधक शक्ती म्हणून ही चळवळ उभी राहीली. दुसरी बाजू बारडोलीचे पाटीदार आणि जलालपोर तालुक्यातील **कोळयांना** गांधी कार्याचे साथीदार म्हणून व राष्ट्रीय कार्यातील साहाय्यक म्हणून बघितले गेले. सर्वसाधारणपणे विविध साध्यची एक शक्ती म्हणून या चळवळीकडे बघितले पाहिजे. या प्रदेशातील लोकांना एक विशिष्ट प्रकारची मान्यता आणि आचरण करण्याची नवीन पद्धती व एक नवीन वातावरणाचा उद्‌भव निर्माण झाल्यामुळे नवीन आंकाक्षा व आवश्यकतांकडे या चळवळीने दिशा दिली. या चळवळीत हिंदू, जैन आणि वाणी तसेच ब्राह्मण प्रभुत्वाचा प्रादेशिक संस्कृतीवर प्रभाव असल्याचे दिसते. या समाजात सन्मानाचा, आत्मसन्मान, शाकाहारीपण, मद्यपान निषेध, स्वच्छतेच्या नियमांचे पालन, साधा पोषाख, साधे घर वगैरे तत्त्वे आहेत. या चळवळीतून एक आशा दिसते की, स्थानिक लोकांकडून भयंकर शोषक म्हणून पारशांसमोर आपल्या हक्कासाठी प्रतिनिधित्व करणारी चळवळ व दुसरी बाजू प्रभावशाली उच्च जाती हिंदू आणि जैन आदर्शांचा चळवळीत स्वीकार दिसतो. दारू-ताडी प्रतिबंधांचे दोन प्रकाराने महत्वाचे स्थान वाटते. १.पारशांविरुद्ध एक मुख्य शस्त्र बनले.२.पवित्रीकरणाचा एक सूचकांक बनला. देवी आज्ञांचा समग्रपणे विचार केला तर ते आदिवासी हक्काचे शक्तीशाली प्रतिनिधित्व ठरले.

देवी चळवळीसारख्या आदिवासी चळवळीचा अभ्यास ब्रिटिश शासन काळातील इतिहासाचा केंद्रबिंदू ठरला. हे कित्येक घटनांच्या अंगाने आपले ज्ञान समृध्द करू शकेल. देवी चळवळी सारख्या

आदिवासी चळवळींचा अभ्यास ब्रिटिश कालीन इतिहासाचे ज्ञान समृद्ध करतात. भारतीय ग्रामातील लोकांनी नवीन व्यवस्थेशी समायोजन करतांना झालेला संघर्ष व त्यातून त्यांनी केलेले अनुकूलन या शिवाय भारतीय राष्ट्रावादातून निर्माण झालेली ग्रामीण भागातील साक्षरता यातून चळवळीने राष्ट्रीय तत्त्वांना प्रकट केले. ब्रिटिश शासनकाळापुर्वीची समाजाची स्थिती, ग्रामीण जाणीवेतील धार्मिकता, त्यानंतर भारतीय समाजावरील ब्रिटिश राज्य आणि कायद्याचा प्रभाव आदिवासींच्या जीवनाचा एक भाग राहिला.

दमन व शोषणाची चिकित्सा केल्याशिवाय आदिवासी मुक्तीचा प्रश्न सुटणार नाही. त्यासाठी दमन व शोषणाला निर्माण करणाऱ्या शक्तीचा शोध घेऊन त्याच्यावर प्रहार केला पाहिजे तेव्हाच समाजाचा उध्दार होईल. मानवी विकासासाठी सर्वोतपरी अशा समाजाची आवश्यकता आहे की, जो समाजाला सुरक्षा, न्याय व स्वतंत्रता याची आवश्यक पुर्ती करू शकेल. स्वतंत्रता याचा अर्थ येथे फक्त शोषण व अत्याचाराशीच नसून व्यक्तिला सक्रिय व उत्तरदायी रूपात समाजरचना व निर्मितीमध्ये भाग घेण्याची स्वतंत्रता असली पाहिजे. यात स्वास्थ वा आरोग्य संबंधीचा विचार हा महत्त्वपुर्ण असून स्वास्थ व स्वच्छता विशेषत: शिक्षण क्षेत्रात सुधारण्याच्या सक्रियेत सहभाग दर्शवितो. यात अन्यायपिडित संरचनेतील शोषित व शक्तिहिन लोकांभिमुख ज्ञानाचे अध्ययन करणे हा मुख्य उद्देश आहे. अशा स्थितीतून समाजाला परिवर्तीत करण्याचा आहे. ज्यातून शोषणाचा अंत होऊन समानतेचा विकास होईल आणि वास्तविक स्वतंत्रतेत वृध्दी होईल. ज्ञानाचा उपयोग हा शोषीत व पिडित वर्गाचे निर्मूलन व विकासासाठी झाला पाहिजे. व्यक्तीमध्ये स्व-जाणीवेची (self-consciousness) निर्मितीकरून समाजातील विसंगती वा विरोधाभास सोडविता येऊ शकतो.

ज्ञान हे संसूचन माध्यमाने समाजात जाणले जाते. अशा प्रकारचे ज्ञान मानवाच्या

विकासासाठी हितकारक आहे. या ज्ञानाचा उद्देश हा भौतिक विश्वाच्या विभिन्न तत्वांना जाणणे आहे त्याचबरोबर मानवावर असणाऱ्या दबाव व प्रभूत्वापासून त्यांचा उध्दार करणे हेही आहे. सामाजिक विश्वाला ऐतिहासिक व व्यावहारिक स्वरुपात आकलन करुन प्रभुत्व व दबावापासून मुक्ती मिळविणे आहे. त्यात लोकांमध्ये सुधारणा व बदलासाठी आदिवासींच्या जीवनात सल्लागार कार्यप्रणाली किंवा त्यांच्यामध्ये जाणीवेच्या निर्मितीस साहाय्यक म्हणून समाजबांधिलकी असणारा कार्यकर्ता वा संशोधक याची आवश्यकता आहे आणि हे कार्य आपण सर्वजण करू शकतो.

**संदर्भसूची :**


१. अरनॉल्ड डेव्हिड व हार्डीमन डेव्हिड (संपा.) १९९९. सबआल्टर्न स्टडीज-VIII: रायटिंग ऑन साऊथ एशियन हिस्टरि ॲन्ड सोसायटी, नवी दिल्ली: ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस. पृ. क्र. ८९- १४७.

२. कुलकर्णी, शरद. १९८५. 'महाराष्ट्रातील प्रतिरोधात्मक चळवळी' हाकारा. महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद: पुणे. वर्ष-सहावे, (I), पृ. ३-६.

३. गारे, गोविंद.१९९१. आदिवासी विकासाचे शिल्पकार. पुणे: श्रीविद्या प्रकाशन.

४. गुहा, रणजित (संपा.) १९९९.सबआल्टर्न स्टडीज-I: रायटिंगस् ऑन साऊथ एशियन हिस्टरी ॲन्ड सोसायटी, नवी दिल्ली: ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस. प्रास्ताविक.

५. फूक्स्, स्टीफन. १९६५. रिबेलिअस प्रोफेट्स: ए स्टडी ऑफ मिसानिक मूव्हमेन्ट इन इंडियन रिलिजन्स. न्यू-दिल्ली: एशिया पब्लिशिंग हाऊस.

६. सिंग, के. एस. १९८३. ट्रायबल मूव्हमेन्टस् इन इंडिया, व्हॉल्युम-२. नवी दिल्ली: मनोहर प्रेस. ७. हार्डीमन, डेव्हिड.१९९६. फिडींग दि बनिया. नवी दिल्ली: ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस. प्रास्ताविक.

८. हार्डीमन, डेव्हिड. १९८७. दि कमिंग ऑफ दि देवी:आदिवासी ॲसरसन इन वेस्टर्न इंडिया: न्यू-दिल्ली, ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस. (प्रास्तविक)

९. हार्डीमन, डेव्हिड. १९८६. देवी आंदोलन (गुजराती अनुवाद, अनुवादक-मेराई शांतीभाई ) दि कमिंग ऑफ दि देवी:आदिवासी ॲसरसन इन वेस्टर्न इंडिया:सुरत, सेंटर फॉर सोशल स्टडीज, पृ. १-४.


* * *

# आदिवासी मातांचे त्यांच्या बालकांच्या स्वास्थ व पोषणाविषयी ज्ञान, मतप्रणाली साठी परिणामकारक संप्रेषण मार्ग

* कु.वैशाली सु.देशमुख

राष्ट्राचे आर्थिक वाटचालीत, समाजाच्या सर्वांगीण प्रगतीत तथा अपेक्षित स्थित्यंतर घडवून आणण्याच्या प्रक्रियेत संप्रेषण मार्गाचे स्थान, भूमिका व योगदान अनन्यसाधारण असेच म्हणावे लागेल. संप्रेषण मार्गाच्याद्वार होणाऱ्या प्रसारणाचे अनुपस्थितीत विज्ञान, तंत्रज्ञान तथा समाजाची प्रगती अशक्यप्राय म्हटल्यास अतिशयोक्ती होऊ नये.

संप्रेषणाचा संबंध अनेक संस्कृतीशी निगडीत आहे. प्राचीन ग्रीस संस्कृतीपासून तर प्रगत अमेरिकन संस्कृतीपर्यंत तथापि, संप्रेषण, शास्त्र म्हणून किंवा मानवी आचरणासाठी देवाण-घेवाणीचायोग्य अभ्यास म्हणून अलिकडच्या काळात उदयाला आले असे म्हणावे.

संप्रेषण शास्त्र क्षेत्रातील एक अधिकारी व्यक्ती डॉ.जे.पॉल लिगन्स यांच्या खालील ओळीवरुन संप्रेषणाचे महत्व लक्षात आले.

जगाने असा काळ कधीही बघितला नसावा की, ज्यावेळी प्रसारणाला जगाच्या प्रगतीच्या दृष्टीने इतके महत्व प्राप्त झाले आहे. कारण जगानी असाही काळ बघितला नसावा की, जगात जाणून घेण्यासाठी इतके प्रचंड ज्ञान आहे, इतक्या लोकांना ते जाणून घेण्याची तीव्र इच्छा आहे व ते शक्य तितक्या अल्पावधीतच प्रभावीपणे जीवन जगण्यासाठी अत्यावश्यक असलेले ज्ञानवृध्दींगत करण्यासाठी तथा अनुकूल मतप्रणाली

* द्वारा-एस.ए.देशमुख, मनकर्णानगर, अमर कॉलनी मागे, बायपास, अमरावती- ४४४६०६

प्रस्थापित करण्यासाठी प्रभावी संप्रेषण मार्गाची आवश्यकता वादीतीत आहे. कुटुंबांतील बालकांचा सर्वांगीण विकास मुख्यत्वे त्यांचे स्वास्थ व पोषण हे या विषयी त्यांच्या मातांच्या ज्ञान व अनुकूल मतप्रणालीवर ब-याचश्या प्रमाणावर अवलंबून असते. हे विधान आदिवासी मातांना तर जास्त प्रमाणात लागू पडते. अर्थात हे सर्व त्यांना प्रभावी संप्रेषणाचे माध्यमाने मिळणाऱ्या माहितीवर सर्वस्वी निर्भर असते. या अनुषंगाने आदिवासी विभागात मातांना त्यांच्या बालकांच्या स्वास्थ व पोषण दर्जाविषयी माहिती देण्यासाठी प्रभावी संप्रेषण मार्गाची निवड करणे गरजेचे आहे. हा प्रमुख उद्देश समोर ठेवून प्रस्तुत अभ्यास घेण्यात आला. तथापि, अभ्यासाचे विशिष्ट उदिष्टये खालीलप्रमाणे आहे.

**परिणामकारकता प्रस्थापित करण्यासाठी संप्रेषण मार्गाची निवड :-**

आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी प्रामुख्याने आदिवासी माता व बालकांच्या आरोग्याकडे लक्ष केंद्रीत करण्यासाठी शासनाच्या वतीने अनेक योजना कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. या आरोग्यविषयक योजना राबविण्यासाठी अंगणवाडी केंद्रातून तथा स्थानिक प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी कार्यरत आहेत. हे कर्मचारी आदिवासी मातांना त्यांच्या बालकांच्या स्वास्थ व पोषणाविषयी माहिती सांगण्यासाठी गृहभेटी, बैठकी, गटचर्चा, व्याख्याने, प्रदर्शने, भिंतीपत्रके, चित्रपट यासारख्या निरनिराळया संप्रेषण मार्गाचा वापर करीत असल्याचे संशोधकांना कर्मचाऱ्यांशी प्रत्यक्ष झालेल्या चर्चेवरुन कळाले. हया संप्रेषण मार्गापैकी काही निवडक संप्रेषण मार्गाची काही विशिष्ट निकषाच्या आधारावर निवड करुन परिणामकारकता पडताळून पाहणे शक्य होते. त्यामुळे संप्रेषण मार्गाच्या बाबतीत सहजता खर्च, वेळ व परिश्रमातील बचत व वैयक्तिक, गट व जनसंपर्क वर्गीकरण गटातील संप्रेषण मार्गाचे प्रतिनिधीत्व या निकषाच्या आधारावर

१) **गृहभेटी**

२) गटचर्चा

३) व्याख्यान

या तीन संप्रेषण मार्गाची त्यांची परिणामकारकता निश्चित करण्यासाठी निवड करण्यात आली व त्यासाठी वापरण्यात आलेली कार्यपध्दती खालील परिच्छेदात स्पष्ट करण्यात आली.

आदिवासी मातांचे त्यांच्या बालकांच्या स्वास्थ व पोषणाविषयी ज्ञानवृध्दी व अनुकूल मतप्रणाली करण्यासाठी

१) आदिवासी मातांना त्यांच्या बालकांच्या स्वास्थ व पोषणाविषयी माहिती देण्यासठी संबंधित कार्यकर्त्याकडून प्रचलित संप्रेषण मार्गाची माहिती संकलित करणे.

२) निवडक संप्रेषण मार्गाची परिणामकारकता प्रस्थापित करणे.

**संशोधन कार्यपध्दती**

प्रस्तुत संशोधन हे विदर्भातील अमरावती जिल्हा अंतर्गत मेळघाट विभागातील चिखलदरा तालुक्यात वसलेल्या खेडयापैकी हेतुपुरस्सर पध्दतीने निवडलेल्या दहा खेडयात घेण्यात आले. या भागात आदिवासी वस्ती व लोकसंख्या तुलनात्मकदृष्टया दाट आहे.

निवडलेल्या दहा खेडयातील आदिवासी मातांच्या याद्या अंगणवाडी व प्राथमिक आरोग्य केंद्र कर्मचाऱ्याकडून प्राप्त करुन त्यातून प्रत्येक खेडयातील २० आदिवासी माता रँडम पध्दतीने एकूण २०० आदिवासी मातांची निवड प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी करण्यात आली.

उदिष्टांना अनुसरुन आवश्यक असलेली माहिती विकसित केलेल्या अनुसूचीच्या सहाय्याने प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे संकलित करण्यात आली. बालकांच्या स्वास्थ व पोषण दर्जाबद्दल आदिवासी मातांचे ज्ञान वृध्दींगत करण्यासाठी तथा अनुकूल मतप्रणाली करण्यासाठी निवडक संप्रेषण मार्गाची परिणामकारकता प्रस्थापित करण्यासाठी विशिष्ट प्रकारचे मोजमापक शास्त्रीय पध्दतीनुसार विकसित करण्यात आले.

प्रथम मोजमापकात समाविष्ट केलेले प्रश्न प्रतिवेदक मातांना विचारण्यात आले व उत्तराच्या अचुकतेच्या आधारावर त्यांना प्रस्थापित गुण प्रदान करण्यात आले. प्राप्त गुणांच्या आधारावर त्यांच्या ज्ञानाबद्दल व मतप्रणालीबद्दल कल्पना आली. त्यानंतर मोजमापकात समावेश केलेल्या प्रश्नाची उत्तरे देता येतील अशा प्रकारचे हस्तलेख (Script) तयार करण्यात आले. या हस्तलेखातील संपूर्ण माहिती प्रतिवेदक मातांना खालील निवडलेल्या संप्रेषण मार्गाद्वारे योग्यप्रकारे देण्यात आली. दिलेल्या माहितीने संपूर्ण समाधान झाल्याची खात्री करुन प्रतिवेदक मातांना पूर्वी विचारलेल्या प्रश्नाप्रमाणेच प्रश्न विचारण्यात आले व उत्तराच्या अचुकतेनुसार त्यांना गुण प्रदान करण्यात आले. नंतर मिळालेल्या गुणातून पूर्वी मिळालेले गुण वजा करण्यात आले व त्यातील फरक गुणावरुन संप्रेषण मार्गाची परिणामकारकता निश्चित करण्यात आली. निवडक संप्रेषण मार्ग, प्रतिवेदक मातांना मिळालेले पूर्वीचे, नंतरचे व फरक गुण खालील तक्त्यात प्रस्तुत करण्यात आले.

**तक्ता**

**प्रतिवेदक मातांचे त्यांच्या बालकांच्या स्वास्थ व पोषणाविषयी ज्ञानवृध्दी व मतप्रणाली अनुकूलतेसाठी संप्रेषण मार्गाची परिणामकारकता**

| क्र. | संप्रेषण मार्ग | ज्ञानवृध्दी व मतप्रणाली अनुकूलतेसाठी संप्रेषण मार्गाची परिणामकारकता दर्शविणारे गुणांक (सरासरी) | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पूर्वी | नंतर | फरक | पूर्वी | नंतर | फरक | पूर्वी | नंतर | फरक |
| १. | गृहभेटी | १३.४० | ५०.१० | ३६.७० | १८.०० | ३८.०० | २०.०० | ३१.४० | ८१.१० | ५६.७० |
| २. | गटचर्चा | १५.७५ | ५५.१९ | ४३.९१ | १९.०० | ४४.०० | २५.०० | ३४.७५ | ९९.१९ | ६९.९१ |
| ३. | व्याख्यान | ०९.०० | ४१.०० | ३२.०० | ११.०० | ३०.०० | १९.०० | २०.०० | ५१.०० | ५१.०० |

वरील तक्त्यातील आदिवासी मातांना ज्ञानवृध्दी व मतप्रणाली अनुकूलतेसाठी वरील संप्रेषण मार्गाच्या प्रभावामुळे किंवा परिणामकारकतेमुळे प्राप्त केलेल्या पूर्वी, नंरत व फरक गुणावर दृष्टीक्षेप टाकल्यावर असे दिसून येते की, प्रतिवेदक आदिवासी मातांचे त्यांच्या बालकांच्या स्वास्थ व पोषण दर्जाविषयी ज्ञानात वाढ करण्यासाठी तथा मतप्रणाली अनुकूलतेसाठी सर्वात परिणामकारक गटचर्चा हे संप्रेषण मार्ग परिणामकारक दिसते. परिणामकारकतेच्या दृष्टीने त्या खालोखाल गृहभेटी व त्या खालोखाल व्याख्यान हे संप्रेषण मार्ग परिणामकारक असल्याचे स्पष्ट होते.

वरील तक्त्यावरुन आणखी एक गोष्ट स्पष्ट होते आणि ती म्हणजे ज्ञानवृध्दीसाठी गृहभेटी तर मतप्रणाली अनुकूलतेसाठी गटचर्चा हे संप्रेषण मार्ग जास्त परिणामकारक असल्याचे स्पष्ट होते.

परिणामकारकतेत एकूण फरक गुणांच्या आधारावर क्रमांक लावल्यास प्रथम गटचर्चा, नंतर गृहभेटी व त्यानंतर व्याख्यान असा क्रम असल्याचे दिसून येते. म्हणजेच ज्ञानवृध्दी व मतप्रणाली अनुकूलतेसाठी गटचर्चा हे संप्रेषण मार्ग परिणामकारक असल्याचे दिसते.

**संदर्भ :-**


| | | |
|---|---|---|
| Anonymous | 2006-07 | Assessment of Nutritional Status of Under Five year Rural Children in selected district, Govt. of India, UNICEF Programme of Co-Operation (03-07) Annual Report pp to-12 Medak District Andhra Pradesh. |
| Barretti, H, and Browne, A | (1996) | Health Hygiene and Material Education Evidence form the Gambi Soc.Sci.Med.4343 (11) : 1579-99 |
| Devdas, R,P. and Easwarn P | (1967) | Influence of Socio Economics Factors of Food intake of Pre Community Jour of Dietetics 4 pp 156-161 |
| Emmons L and Hayes M | (1973) | Nutritional Knowledge of Mother and children. J. Nutritional and educaton 5 : 134 |
| Ghatoi and Kale | (1998) | Problems Associated with child Rearing Among Korku Mothers in Melghat.J. of Mah.Extn Edu$^{n}$. VolXp1197 |


* * *

R-578
7

# गडचिरोली जिल्हयातील नक्षलवाद विरुध्द लढा

* कु. भारती मालू बांगामी

गडचिरोली नांव समोर आलं की, रक्तथरार भयभयीत मन आणि जीवनाला कंटाळलेली माणसं डोळयासमोर आल्याशिवाय राहत नाही. मी मुळची लाहेरी गांवातील. सगळीकडे जंगल, संपूर्ण मागासलेलं गांव, वैचारिकदृष्टया आणि आर्थिकदृष्टयाही.

माझे प्राथमिक शिक्षण (१ ली ते ५ वी पर्यंत) लाहेरी या माझ्या मूळ गांवातच झाले. घरापासून शाळा २ कि.मी.लांब होती. जंगलातील रस्ता, कोणत्याही वाहनाची सोय नाही. तेव्हा मी शाळेत चालत जायची. मला शाळेत शिकण्याची खूप आवड होती. ५ वी मध्ये नवोदय विंद्यालयाची प्रवेश परीक्षा दिली आणि सुदैवाने मी पास झाले. अशाप्रकारे ६ वी ते ९ वी पर्यंत शिक्षण नवोदय विद्यालयात झाले. त्यानंतर १० वी ला हेमलकसा व अहेरी येथे शिक्षण झाले.

माझा १२ वी चा पहिलाच पेपर होता आणि कळलं की, ज्या वडिलांच्या मायेच्या छत्रछायेखाली मी वावरत होते, त्यांना नक्षलवाद्यांनी ठार केले होते. खूप भावूक झाले. पायाखालून जमीन सरकली, शरीराचा कण अन कण थरारला. हृदय पिळवटलं, अंगात कसलीच ताकद उरली नाही, अन डोळयासमोर काळोख झाला. अशा परिस्थितीतही मी स्वतःच्या मनाला कठोर केले. विचार केला गेलेली व्यक्ती पुन्हा येणार नाही आणि ती संधीही. खूप विचार केल्यानंतर १२ वी चा पेपर द्यायला अहेरीला गेले. पेपर देऊन येताना मला बाबा आमटे भेटले आणि माझ्या निर्णयाबद्दल माझी पाठ थोपटली. त्यांचा आशिर्वाद घेऊन मी घरी आले.

*मु.लाहेरी, पो.ता.भामरागड, जि.गडचिरोली

मला घरी आल्यानंतर वडिलांना शेवटच्या मयत अवस्थेतही पाहता आलं नाही. हा काळाचा असा अघोरी आघात सहन करण खूप अवघड होत.

माझी हुशारी आणि शिकण्याची जिद्द पाहून माझ्या भाऊजींनी मला पुण्याला शिकविण्याचा ठरवलं. मला खूप आनंद झाला. कारण पुणे हे नांव ऐकणंही आमचं स्वप्न. माझ मनही पुण्याच्या रंगीन स्वप्नात रंगू लागलं. माझा प्रवेश बी.एस. डी.टी.एस.आयुर्वेद महाविद्यालय, पुणे येथे झाला.

गडचिरोली या आदिवासी दुर्गम जिल्हयावरुन पुण्याला मी रेल्वेने आले. तो रेल्वे प्रवास माझ्या आयुष्यातील अविस्मरणीय क्षण होय. पण पुण्यात आल्यावर मी भांबावून गेले. इथले लोक, वातावरण, त्यांची भाषा, चालणं-बोलणं, सगळंच वेगळं. माझे जीवन स्थिरावत असताना मी दुसऱ्या वर्षात शिकत असताना माझ्या डोक्यात (Brain Tumour) आहे, असे समजलं.आणि अशाप्रकारे नशिबाने माझ्यावर दुसरा आघात केला. मन हेलावून गेलं. माझी शस्त्रक्रिया व्यवस्थित व यशस्वीरित्या पार पडली. पण काही वर्षे मात्र त्रास देऊन गेली.

पण मी ठरवून टाकलं की, काही झालं तरी मी शिक्षण पूर्ण करणार आणि ते मी पूर्ण केलंही. आज मला अभिमान वाटतो की मी एक डॉक्टर आहे. लोकांची सेवा करण्याची संधी मला मिळणार आहे आणि त्यांचा विश्वास मी नक्कीच सार्थ करेन.

आपला समाज अजूनही खूप मागासलेला आहे. या लोकांना पुढे आणण्याची नितांत गरज आहे. वैद्यकीय सेवेतून मी नक्कीच जनसेवा करेन. परंतू जेव्हा या सेवेतून वेळ मिळेल तेव्हा आपल्या समाजाला ताठ मानाने जगता येईल यासाठी मी सदैव प्रयत्नशील राहीन.

* * *

# आदिवासी जीवन व संस्कृती

*श्री. न.बा.मांडके

आदिवासी समाजाबद्दल सर्वसामान्य लोकांमध्ये व अगदी उच्चशिक्षित लोकांमध्ये देखील अनेक प्रकारचे गैरसमज आढळून येतात ते सर्वार्थाने चुकीचे असतात. आदिवासीचे प्रश्न समस्या म्हणजे केवळ एखादा गरीब, अप्रगत, टाकावू, दारिद्री लोकांचे प्रश्न हा एक मोठा कटू गैरसमज समाजात दिसून येतो.

**आदिवासी समाज व संस्कृतीची वैशिष्टये :-**

आदिवासी समाज व संस्कृतीची वैशिष्ठये ही योग्य त्या अभ्यास प्रक्रियेतून समाजावून घेतली पाहिजेत. त्यांना स्वतःची (स्वत्वाची) अशी अत्यंत देखणी विलोभनीय क्वचितकाळी अगदी हेवा वाटणारी संस्कृती आहे. त्यांच्या समाजाला विशिष्ट प्रकारची व पध्दतीची बांधणी, विचारसरणी व तत्वज्ञान आहे.ती मनापासून समजावून घेऊन त्यादृष्टिने त्यांच्यात उद्‌भवलेल्या समस्येचे स्वरुप अंगोपांग न समजता सहा घोडे बारा टक्के या न्यायाने त्या सोडवण्याचा प्रयत्न करणे म्हणजे प्रचंड वेळेचा , मुनष्य बळाचा व धनाचा, दुरुपयोग करण्यासारखेच आहे. दुर्देवाने आपला समाज व तद्‌अनुषंगिक धुरीमध्ये देखील याबद्दलतेची प्रगलभ जाण अभावानेच आढळते.

**आदिवासीची जीवनशैली :-**

समाज व संस्कृती तिच्यात अंतर्भूत असलेले हृदयस्पर्शी जीवन, ज्ञान, तत्वज्ञान या पैलूचा एकताने (Holistically) साधक-बाधक विचार करुन काव्य रचनाबध्द करण्याचा एक नम्र प्रयत्न आहे.

* श्री. न.बा.मांडके ,००३, पंचरत्न टॉवर्स,शिवानंद गार्डन,कोथरुड,पुणे

**आदिवासी संस्कृती :-**

यांत आदिवासी वस्तीच्या गांवचा आजूबाजूचा भौगोलीक परिसर, नैसर्गिक वातावरण त्यांची सर्वसाधारण विचारसरणी व वैशिष्टे तिच्यावर असलेले त्यांचे ऋुणानुबंध, प्रेम, माया, ममता, विश्वास, अतुट नाते, दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. तिच्यात अंगीभूत असलेला इतिहास, काव्य कला, निसर्गाशी जुडलेले प्रदीर्घ व चिंतनशील नाते शब्दबध्द करण्याचा प्रयत्न आहे.

**आदिवासीचे सामुहिक जीवन :-**

गणगोत, संस्कृती, सदैव- सर्वकाल एकत्रित राहण्याची, सर्वांचाच विचार करणारी सहजीवनाचे वैशिष्टेपूर्ण वर्णन करणारे असे त्यांचे जीवन असते.

**१. सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तन :-**

सामाजिक बदल घडवितांना आंतरिक प्रेमाचा ओलावा जपण्याचा प्रयत्न केलेला असतो. ते घडत असतांना आंतला माणूस कसा जपला पाहिजे. हे त्यांच्या सहज वागणूकीतून दिसून येते.

**आदिवासी विवाह :-**

विचार सरणी, विवाहाची मूल्य तत्वे, विचार-सरणी त्यांच्यातील सामाजिक बंधनाचे स्वरुप, पति-पत्नीमधले सुरेल नाते, वयामधील अंतर, बरोबरीचे नाते, ऐकमेकावरील दुर्दम्य विश्वास, श्रध्दा प्रेम समानता दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. कोणत्याही संस्थापित कारणातून कधी कधी आंतला सृजनशील माणूस कोमेजला/ दुखावलेला, दुरविला जाता कामा नये. संस्था माणसाकरता असून माणूस संस्थेकरता नाही ही मूलगामी तत्वप्रणाली जपली पाहिजे. कालमानाप्रमाणे संस्थामध्ये आरोग्यदायी व निकोप लवचिकता असावयास पाहिजे.

**घोटूल संस्कृति :-**

आदिवासीची वैशिष्ठपूर्ण सामाजिक संस्थापूर्वीच्या काळी तिला फारच महत्व होते. आता त्यामानाने कमी झाले आहे. **घोटूल** ही सामाजिक व सांस्कृतिक, ज्ञान-संक्रमण, करणारी प्रभावशाली संस्था आहे. Encutturation / Socialization या प्रक्रियेचा जो आत्माच आहे असे म्हटल्यास वावगे ठरु नये. तिचे योग्य ते मूल्यमापन, त्यांच्या दृष्टिकोनातून (emic) करण्याचा प्रयत्न केला आहे. खरे तर हल्लीच्या (Modern) एक्कलकोंडी व्यक्तिला, समाजाला अशा संस्थेची अत्यंत गरज आहे. असे विचाराअंती समजून येईल. अनौपचारिक सामाजिक आंतरप्रक्रिया हा जीवनवृध्दि , जीवनसमृध्दीच्या अनुषंगाने विचार करावयास लावणारा एक पैलू आहे.

**१. श्रमसंस्कृती :-**

ईश्वर पारायणता, त्यांचे प्रयत्न, त्यांचे प्रश्न, समस्या, त्यावरील सखोल चिंतन, मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न कोणत्याही समाजाचे आंतरिक मूल्य (सत्व) जिवंत ठेवूनच त्यात बदल करावयाचे असतात हे विसरुन चालणार नाही. कारण तो समाजाचा आनंदस्त्रोत आहे.

**२. प्रार्थना :-**

आदिवासीना नेमके काय मागावयाचे आहे. त्याची सभ्यता, संस्कृती, आत्मसन्मान,स्वातंत्र का व कसे टिकवायचे याबद्दल विचार प्रदर्शन केले आहे. स्वकष्टार्जित, सन्माननीय जीवन कोणत्या समाजातील लोकांना नको असतो, परांवलंबित्व कोणाला आवडते ? कारण खरे समाधान कशांत आहे. केवळ आर्थिक दृष्टिने महान याचक म्हणून त्यांना हिणवून घ्यावयाचे नाही. तर ईश्वरांचे अधिष्ठान असलेली गौरवशाली समाज व संस्कृती त्यांना अभिप्रेत आहे. यातूनच काही स्फुरलेले काव्य येथे प्रकाशित करण्यात आले आहे, ते पुढीलप्रमाणे:-

### आमचे आगळे वेगळेपण

आदिवासी आम्ही भूमिपुत्र आम्ही
चिरमुल्य संधारुन श्रीनिवासी
कृति कार्यनिष्ठेतुन स्नेहवादि
जाणीव नेणीवेतून आदिवासी १

आम्ही वावरे ज्या वनकाननांत
पशु-पक्षी आमुच्या सह नांदतात
आम्ही जाणतो त्या समवेदनेत
आश्वस्त होतो सहजीवनांत २

घर राहतो जे आम्ही बांधतोहि
सुतार मिस्त्री आदि सर्व आम्ही
भिंती नि खिडकी छत अंगणहि
परिपूर्ण करण्या श्रमतात सारी ३

गरीबातल्या गरिबासहि
घर देत मी पत देत मी
बांधील मी जपण्यालाहि
संपूर्ण स्व रत व्यक्तिहि ४

दरि- डोंगरी अनवाणी मी
ओझे जरि पाठीवरी
पळू धावतो दुडदुड मी
परि अंतरि मन- मस्त मी ५

### वचनामृते

आदिवासी बोलीत संपर्क साधे
हृदयातुनि त्या प्रतिसाद लाभे १

आदिवासी पंचायत रीत वागे
तंटा बरवेडा निमिषांत साधे २

आदिवासी घरटी जो कोणी पोचे
अतिथी उपाशी कधीही न राहे ३

वनवासी कुटुंब जवळिक जेव्हा
आई- बाळ संबध कळतील तेव्हा ४

* * *

## घोटूल संस्कृति

पति पत्नि जशी मज सारखी
मुलगा - मुलगी कां वेगळी !
सूनबाई जावई लाडकी
नातू नि नात खटयाळ ती ... १

आई बाप होण्यापूर्वी ती
नियमीत घोटूल जात ती
श्रमतप्तरी कार्यातूनी
रचनेस समजून घेत ती ..२

मित्रासवे खेळून ती
बहुभूमीका साकारतो
गाण्यातुनि नाचातुनि
कौशल्य गुण संपादिती..३

धैर्यातूनि शौर्यातुनि
नवनित्य संकट साहसी
यमनियम नीती जाणूनि
संसार करण्या सज्ज ती..४

समजून गण-कुल संस्कृति
विविधांग कांति फुलविती
गणगोत आंतुन सांधिती
सुखवीत मज किती अंतरि..५

पशु- पक्षी संगत वाढती
वाऱ्यासवे उडू पाहती
फांद्यावरी बसुनीच ती
देवांसवे गुज- गोष्टी ती ...६

जवल विंधण्या विहिरतुनि
घर बांधण्या श्रमतात ती
रानातुनि भटकून ती
तरु काष्ट इंधन आणिती..७

कार्यातुनि पळू धांवती
लय-मेळ जणु सर्वातुनि
श्रमति किती थकति अति
मर्म बंधातिल ठेव ती ..८

लग्नातल्या सहमंडपी
पितरातल्या विधीतर्पणी
मयतातल्या शोकांतुनि
शिकतात ते श्रिय संस्कृती..९

प्रतिभाच ती प्रगतीच ती
ह्रदयातली गती - श्वास ती
मम भावना आकळून ती
युवशक्ति युवानीती ती..१०

* * *

## श्रमसंस्कृति - अनिश्चितता - ईश्वरपरागणता

शेतातल्या कामांतुनि
श्रमतो आम्ही हरहुन्नरी
तण वेचूनि कण भाजुनि
बी लावणी अन् पेरणी ..१

पाऊस ताल नि मेळ ना
जेव्हा हवा तो येईना
असता नको तो बरसता
पिकनाश ना ये आवरता..२

लहरीतल्या वरुणातुनि
शिशीरातल्या मेघांतुनि
क्षण देतसे हुलकांवणी
कण जातसे निसटूनहि..३

बी पेरुनि उगवेच नां
मृदू अंकुरा उजवीत नां
कशी पेरणी वा लावणी
कणगीतुनि भरु काय मी ? ..४

शास्त्रात ना परिपूर्णता
अंदाज ना आधार ना
अनभिज्ञता अनवस्थता
अपुरेपणा अधुरेपणा ..५

सातत्य अन् परिवर्तनि
आम्हि जागतो दिनरात्रही
क्षणपूर्व अन क्षण उत्तरी
त्या वंदिताऽ क्षण अन् क्षणी..६

* * *

## प्रार्थना

आम्ही मागतो परमेश्वरा
कष्टांतुनि यश दे आम्हा
पाऊस बरवा पाड ना
बी पासूनि धन धान्य द्या..१

पाऊस पूर्वीसारखा
ऋतुचक्र त्या साजेलसे
श्रमनीती स्थापित होऊ द्या
आनंद सात्विक निर्मू द्या..२

मायबाप सरकारचे धोरण
सरकार म्हणते माग बां
श्रीमन भिकारी हो नरा
बांधील मिंधा हो नरा
कल्याण करि मज सत्वरा..३

ज्ञानेंद्रिया कर्मेंद्रिया
बाजूस त्या ठेवून या
जे मानवि म्हणूनि दिले
त्या त्यागुनि मज शरण या..४

मागतो मी कोणास आणि
कोण मजला देतसे
मागतो मी काय आणि
काय मजसी मिळत रे !..५

* * *

# वृत्त विशेष :-

## आदिवासी हस्तकला प्रदर्शन -२००९-२०१०

या संस्थेमार्फत दिनांक २.२.२०१० ते ६.२.२०१० या कालावधीत राज्यस्तरीय आदिवासी हस्तकला प्रदर्शनाचे आयोजन प्रथमच संस्थेच्या प्रांगणात करण्यात आले होते. सदर प्रदर्शनाचे उद्घाटन मा.डॉ.श्री.शैलेशकुमार शर्मा, भा.प्र.से.जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमी अभिलेख (महाराष्ट्र राज्य) यांचे शुभहस्ते व मा.डॉ.अरविंदकुमार झा, भा.व.से. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली दि.२.२.२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झाले.

आपल्या उद्घाटनपर भाषणात मा.डॉ.शैलेशकुमार शर्मा, जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी आदिवासी बांधवानी हस्तकलेद्वारे तयार करण्यात आलेल्या वस्तुंना बाजारपेठ उपलब्ध करुन देण्याची गरज असल्याचे सांगितले. अशाप्रकारची आदिवासी हस्तकला प्रदर्शने राज्याच्या विविध विभागात विभागीय पातळीवर आयोजित करण्यात आल्यास आदिवासी बांधवांना प्रोत्साहन मिळेल तसेच त्यांच्या वस्तुंची विक्री झाल्यामुळे त्यांना निश्चित असे आर्थिक पाठबळ मिळेल. तसेच आदिवासींचे बचत गट स्थापन करुन त्याद्वारे बाजारपेठ उपलब्ध करुन दिल्यास त्यांना रोजगाराची संधी निर्माण होईल व समाजाच्या मुख्य प्रवाहात लवकरात लवकर ते सामील होतील, अशी अपेक्षा व्यक्ती केली.

या प्रदर्शनाचे वैशिष्टय असे होते की, संजीवन विद्यालय ट्रस्ट पाचगणी येथे शिक्षण घेत असलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांनी सुध्दा त्यांच्या हस्तकला वस्तुचा वैशिष्ठयपूर्ण असा स्टॉल लावलेला होता. तसेच श्री.जाधव गुरुजी यांनी आयुर्वेदिक वनौषधी व उपचार याबाबतचा स्टॉल लावला होता.

या प्रदर्शनात महाराष्ट्राच्या आदिवासी भागातून आलेल्या जवळपास ४७ कलाकारांनी त्यांच्या हस्तकला वस्तु विक्रीसाठी आणलेल्या होत्या. या प्रदर्शनात वारली पेंटींग्ज, मेटल क्राफ्ट/ क्राफट, बांबूकाम, आदिवासी/ड्रीफटवूड वनौषधी इत्यादी वस्तु विक्रीसाठी उपलब्ध होत्या. या प्रदर्शनाच्या कालावधीत आदिवासी कलाकारांच्या सुमारे दोन लाख चाळीस हजार किंमतीच्या वस्तूची विक्री झाली.

- **आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत आयोजित करण्यात आलेल्या प्रशिक्षणाबाबत**

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षण विभागामार्फत माहे सप्टेंबर,२००९ ते फेब्रुवारी,२०१० या कालावधीत विज्ञान, इंग्रजी व गणित, अद्यापन पध्दती, माहिती अधिकार कायदा,२००५, कार्यालयीन कामकाज, माहिती व जनसंपर्क, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणीची कामकाज पध्दती, शासकीय आश्रमशाळेतील उपलेखापाल/वरिष्ठ लिपिक, मुख्याध्यापक, नवनियुक्त, कनिष्ठ लिपिक, क्रीडा शिक्षक प्रशिक्षण, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीतील अधिकारी, दक्षता पथकातील पोलीस अधिकारी यांना न्यायिक पध्दतीचे प्रशिक्षण आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे आयोजित करण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षांच्या पूर्वतयारीकरिता परीक्षा मार्गदर्शन सत्रे आयोजित करण्यात आली. तसेच वन हक्क कायदा,२००६

अंमलबजावणीकरिता जी.पी.एस.वापराबाबतची प्रशिक्षण सत्रेही आयोजित करण्यात आली होती. सदर प्रशिक्षणाचा लाभ आदिवासी विकास विभागातील अधिकारी/कर्मचारी व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना झाला.

* * *

# TRIBAL RESEARCH & TRAINING INSTITUTE'S PUBLICATIONS FOR SALE

## संस्थेची विक्रीची प्रकाशने

| Sr. No. | Name | Price Rs. |
|---|---|---|
| 1. | An Overview Of Tribal Research Studies | 100.00 |
| 2 | Strategies For Promotion & Propagation Of Tribal Arts & Handicrafts | 50.00 |
| 3. | Socio-Cultural Dynamics Of Tribal Development | 19.00 |
| 4. | *"Nagarikanchi Sanad"* (Marathi Publication Of TDD, Mumbai) | 16.00 |
| 5. | Compilation of Government Resolutions -Incentives Provided To The Govt. Employee Working In Inaccessible Areas Located In Tribal Areas - | 115.00 |
| 6. | Survey of Padas in Mumbai & Mumbai-Sub Urban District. | 141.00 |
| 7. | Development Of Primitive Tribes In Maharashtra :Status, Continuity & Change | 115.00 |
| 8. | Bi-Annual Publication "Tribal Research Bulletin" | (Rs. 50/- per Bulletin) |
| 9 | Tribal Handicrafts of Maharashtra : Cultural & Transitional Perspective. | Rs.225/- |
| 10 | Review of Tribal Research Studies | Rs.35/- |

मुद्रणस्थळ : शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे - ४११ ००१.



राज्यस्तरीय आदिवासी हस्तकला प्रदर्शनात दक्षिण कोरियाचे पाहुणे वारली चित्रकला पाहताना.



राज्यस्तरीय आदिवासी हस्तकला प्रदर्शनात जव्हारचे कारागिर लगदा मुखवट्याचे प्रात्याक्षिक करुन दाखविताना.

## TRIBAL RESEARCH BULLETIN

Tribal Research & Training Institute,
Maharashtra State, Pune-411001.
Web Site : http://trti.mah.nic.in
Email: trti.mah@nic.in

Tribal Research Bulletin is a bi-annual bulletin published in March and September. Contributors can contribute articles pertaining to various aspects related to tribal life, culture and development.

**Guidelines for Contributors**

The manuscripts to be published in this Bulletin should be typewritten in double space on one side of the paper and carefully edited for matter as well as language and corrected for any typing errors. The matter should be organized under suitable headings. Tables should be preferably incorporated in the body of the paper with relevant interpretation. Charts and maps should be in black and white only. Soft copy of the manuscript is welcome.

Manuscripts are not returned.

The views expressed by the authors do not necessarily reflect the views of the Government, and the Editor is not responsible for the views expressed by the authors.

The contributors will be given 2 reprints and two copies of the Bulletin.

All correspondences should be addressed to the Commissioner, Tribal Research and Training Institute, 28, Queen's Garden, Pune-411001.

Registration No. 37/438/79

**FORM IV**

(See Rule 80)

| | |
|---|---|
| 1. Place of publication | 28, Queen's Garden, Pune-411001 |
| 2. Periodicity of Publication | Bi-annual |
| 3. Printer's Name | Manager Photozinco Press, Pune-411001 |
| Nationality | Indian |
| Address | Photozinco Press, Pune-411001 |
| 4. Publisher's Name | Dr.Arvind Kumar Jha, IFS. |
| Nationality | Indian |
| Address | 28, Queen's Garden, Pune-411001 |
| 5. Editor's Name | Dr.Arvind Kumar Jha, IFS. |
| Nationality | Indian |
| Address | 28, Queen's Garden Pune-411001 |

I, Dr. Arvind Kumar Jha, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Dr. Arvind Kumar Jha, IFS.
(Signature of Publisher)

Annual Subscription Rs. 100/-
Cost of Single copy Rs.50/-

मुद्रणस्थळ : शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे - ४११ ००१.